नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

पुडकोपनिषद ....

प्राचीन विदर्भाचे काव्य ....

‘प्रकट गुह्य बोले’ ....

पुस्तक -परामशर् ....

साभार स्वीकार ....

संघवार्ता ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशाकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें : अंक ३ रा

जून १९५६

संपादकीय

'युगवाणी' च्या गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या संपादकीय धोरणाबद्दल अनेकांनी आपलें समाधान व्यक्त केलें आहे. यास्तव आम्ही या मित्रांचे फार आभारी आहोंत. 'युगवाणीं' त असणाऱ्या उणीवा, व अपेक्षित सुधारणा यांचें दिग्दर्शन करणाऱ्या कांही निश्चित विधायक सूचना सहृदय वाचकांकडून आल्यास आम्हाला विशेष आनंद वाटेल. अशा सूचनांचा यावच्छक्य परामर्श घेण्यांत येईल.

'युगवाणींत' त दीर्घकाल येत असलेल्या लेखमालांबद्दल मात्र एक दोन मित्रांनी थोडी नापसंती व्यक्त केली आहे. ती, लेखमाला अयोग्य आहेत या सबबीवर नसून गंभीर विषय तुटकतुटकपणे वाचण्यांत अर्थसंगति नीट लागत नाही व विषयग्रहणांत अंतराय उत्पन्न होतो या सबबीवर होय. या आक्षेपाचें लक्ष्य कै. डॉ. दफ्तरी यांची उपनिषद् विषयक लेखमाला होय हें उघड आहे. तरी त्यासंबंधी आमचें धोरण काय तें सांगून टाकतों. कै. डॉ. दफ्तरी यांच्या अनेक अप्रकाशित ग्रंथांत प्रस्तुत उपनिषद्ग्रंथ हा फार मौलिक स्वरूपाचा आहे या बद्दल कोणाचें दुमत होईल असें नाही. त्यांत प्रतिपादन केलेलीं मतें कित्येक शांकरभक्तांना मान्य नाहीत याची आम्हांला जाणीव आहे. पण येवढयाने तो ग्रंथ प्रसिद्धीला अयोग्य ठरत नाही. किंबहुना तो ग्रंथ प्रसिद्ध होण्यास तेंहि एक बलवत्तर कारण आहे. सदरहू ग्रंथ समग्र स्वरूपांत छापण्याचा निश्चय शासन साहित्य परिषदेसारखी समर्थ संस्थाच करूं शकते. तशी कांही व्यवस्था झाल्याचें दिसतांच आम्ही 'युगवाणीं'तील ही लेखमाला बंद करूं. तोंवर तरी ती चालूं ठेवणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. 'मध्यप्रदेश संशोधन मंडळ' देखील या ग्रंथाच्या प्रसिद्धीची कांही योजना आखीत असल्याचें आमच्या कानीं आलें आहे. त्यांचें सामर्थ्य अपुरें असलें तरी योजना स्वागतार्ह आहे. "ही लेखमाला तुटक तुटक न देतां एका वर्षांतील सर्व अंक पूर्णपणे त्याच ग्रंथाला देऊन संपूर्ण ग्रंथ हातावेगळा करावा म्हणजे एक महान् कार्य 'युगवाणी' ने केल्यासारखें होईल. संपूर्ण कादंबरी छापून जर एखादें

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नियतकालिक आपला पूर्ण विशेषांक काढूं शकतें तर 'युगवाणीं' त संपूर्णपणे एखादा गंभीर ग्रंथ आल्यास कोठे बिघडलें ? दहा पांच चिल्लर लेख मागाहून प्रसिद्ध झाले तरी चालतील." अशी सूचना एका मित्राने केली आहे. या सूचनेमागे त्रागा नाही; तळमळ आहे हें आम्ही जाणतों. पण ती अंमलांत आणली तर अनेक वाचकांना पचणार नाही ही भीति आहे. खरे अभ्यासक तुटक लेखमालेंतूनहि मर्मग्रहण करीत असतातच.

टिळक आगरकर-विशेषांक

येत्या आगस्टमध्ये टिळक व आगरकर या दोन महापुरुषांचा जन्मशताब्दि उत्सव साजरा होणार आहे. या दोन राष्ट्रपुरुषांस 'युगवाणी' हि आपली श्रद्धाञ्जलि अर्पण करण्यासाठी एका विशेषांकाची योजना करणार आहे. १ आगस्ट १९५६ या दिवशीं हा विशेषांक प्रसिद्ध होईल. म्हणून आमच्या लेखक बंधूंना सविनय प्रार्थना आहे की या दोन महापुरुषांच्या विविध कार्यांपैकी कोणत्याहि पैलूवर विवेचन करणारे अभ्यासपूर्ण व विचारप्रवर्तक लेख जून अखेरीपर्यंत आमच्याकडे पाठवावेत. अशा लेखांवरच संपादकाचा हा निश्चय तडीस जाईल हें उघड आहे.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
२. नाटककार गडकरी	--श्री द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	-कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडकोपनिषद्

कै. डॉ. के. ल. उर्फ भाऊजी दफ्तरी

मुंडक २, खंड २, श्लोक २

यदर्चिमद्यदणुभ्योऽणु च ।
यस्मिन् लोका निहिता लोकिनश्च ॥
तदेतक्षरं ब्रह्म स प्राणस्तदुवाङ्मन: ।
तदेतत्सत्यम् तदमृतं तद्वेद्धव्यम् सौम्य विद्धि ॥२॥

अर्थ:—जो प्रकाशरूप आहे [अर्चिमत्] (कारण त्याच्या प्रकाशामुळेच सर्व जगाचें ज्ञान होतें. "तस्य भासा सर्वमिदं विभाति" हें कठ ५ । १५ येथील वचन पहा व मुंडकांतील २ । २ । १० पहा) जो लहानापेक्षाहि लहान आहे, आणि ज्यावर हे सर्व समाज [लोका:] आणि त्यांतील व्यक्ति [लोकिन:] ठेवलेल्या आहेत म्हणजे अवलंबून आहेत, (कारण पूर्णानंदयुक्त अशा ब्रह्मज्ञाच्या कृतीमुळेच, "अथ य आत्मा स सेतुर्विधृतिरेषां लोकानाम-संभेदाय" छां. ८ । ४ ह्यांत सांगितल्याप्रमाणे, समाज व त्यांतील व्यक्ति सुस्थितींत असतात.) तो हा जीव अक्षर ब्रह्मच म्हणजे अव्याकृत ब्रह्मच होय. तोच प्राण, तोच मन, होय. तो सत्य आहे, (खरा आहे, आभास नव्हे असा भाव) तोच आनंद आहे [अमृतम्] आणि तोच, हे बाळा, वेद्धव्य म्हणजे प्राप्तव्य आहे असें जाण. ॥२॥

टिप्पणें:—जीवस्थितींतच कोणतेंहि ज्ञान संभवतें. आनंदाचें ज्ञान व अर्थात् अनुभवहि जीवस्थितींतच असतो. म्हणूनच अर्चिमत् हें विशेषण जीवासच लागतें आणि म्हणूनच जीवाला येथे "अमृत" म्हणजे आनंद म्हटलें आहे आणि तोच प्राप्तव्य होय असें म्हटलें आहे. ह्याचा अर्थ आनंदपूर्ण जीवावस्था प्राप्तव्य आहे असा होतो. ती कशी मिळवावी तें पुढील श्लोकांत सांगितलें आहे.

मुंडक २, खंड २, श्लोक ३-४

धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रम् ।
शरं ह्युपासानिशितम् संधयीत ॥
आयम्य तद् भावगतेन चेतसा ।
लक्ष्यं तदेवाक्षरं सौम्य विद्धि ॥३॥

प्रणवो धनु: शरो ह्यात्मा
ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ॥
अप्रमत्तेन वेद्धव्यम् ।
शरवत्तन्मयो भवेत् ॥४॥

अर्थ:—उपनिषदांमध्ये सांगितलेलें, मोठे बाण फेकणारें [महास्त्रं] धनुष्य हातांमध्ये धरून, उपासनेने घासून तीक्ष्ण केलेला [उपासानिशितम्] बाण त्यावर ठेवावा. आणि भावनाकरणाच्या [भावगतेन] चित्ताने तें धनुष्य ओढून, हे बाळा, तेंच मागील दोन श्लोकांत वर्णिलेल्या त्याच [तदेव] आविष्कृत अक्षर ब्रह्माचा तूं वेध कर. ॥३॥

टिप्पणें—महास्त्रं = मोठें अस्त्र, अस्यते अनेन तद् अस्त्रं.

"संधयीत"—हा भ्रष्ट पाठ आहे असें दिसतें. "संदधीत" असा शुद्ध पाठ घेऊन अर्थ करावा लागतो.

"विद्धि" हें विद् म्हणजे जाणणें ह्याचें रूप आहे. तथापि येथे त्याचा भावार्थ "वेध कर" असाच होईल.

अर्थ:—प्रणव म्हणजे ॐ हें अक्षर हेंच धनुष्य आहे. आत्मा (म्हणजे बुद्धि) हा शर आहे आणि तें ब्रह्म हें लक्ष्य आहे असें म्हटलें जातें. चुकी न करतां

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

[अप्रमत्तेन] त्याचा वेध करावा. शराप्रमाणे ब्रह्ममय व्हावें. ॥४॥

टिप्पणें—आत्मा म्हणजे बुद्धि, विचारशक्ति असाहि अर्थ आहे. आपटयांचा कोश पहा. वरील दोन श्लोकांचा शब्दार्थ फार सोपा आहे. पण त्याचा खरा भावार्थ चांगला समजवून घेणें जरूर आहे. कारण पुष्कळजण ह्याचा भावार्थ चित्तवृत्तिनिरोध समजून कठवल्ली ६ । १०–११ ह्यांत वर्णिलेला योग साध्य करून घ्यावा असें म्हणतात. पण तें चूक आहे. ह्या श्लोकांचा खरा भावार्थ समजण्यास पुढील गोष्टी लक्षांत आणल्या पाहिजेत. (१) तिसऱ्या श्लोकांत "लक्ष्यं तदेवाक्षरं" असें म्हटलें आहे आणि चवथ्या श्लोकांत "लक्ष्यं तत् ब्रह्म" असें म्हटलें आहे. "तदेव" आणि "तत्" म्हणजे श्लोक १ । २ मध्ये वर्णिलेलें आविष्कृत ब्रह्म म्हणजेच आनंदपूर्ण जीवात्मा असा अर्थ स्पष्ट आहे. (२) प्रणव हें धनुष्य आहे. प्रणवं म्हणजे ॐ हें अक्षर. ॐ ह्याने उपासना करणें म्हणजे काय ? प्रश्नोपनिषत् पांचवा प्रश्न (५ । ५–७) ह्यांतहि ॐच्या अ, उ आणि म् ह्या तीनहि मात्रांचें एकदम ध्यान केलें तर ब्रह्मलोकाची प्राप्ति होते व परम पुरिशय पुरुष दिसतो असें सांगितलें आहे. मांडुक्यांत अ म्हणजे जागृति, उ म्हणजे स्वप्न आणि म् म्हणजे निद्रा असें स्पष्ट सांगितलें आहे. (मांडुक्य ९–११ पहा). ह्यावरून तीनहि अवस्थांचा विचार करून जो सिद्धांत ठरतो तो मनांत दृढ ठेवून त्याप्रमाणे वागणें हेंच ॐचें ध्यान आणि हीच ब्रह्माची उपासना होय. ह्या तीन अवस्थांच्या विचाराने सिद्धांत कोणता ठरतो ? आत्मा अद्वैत आणि आनंदरूप आहे हा सिद्धांत ठरतो. आणि असेंहि ठरतें की आत्मा अद्वैत आणि आनंदरूप आहे; ह्याचें ज्ञान व ह्याचा अनुभव जागृतींतच होऊं शकतो. (प्रश्नोपनिषद् प्रश्न ५ वरील आमचें विवरण पहा.) (३) "शर आत्मा आहे" ह्यांतील "आत्मा" ह्याचा अर्थ काय ? जीवात्मा हाच जर लक्ष्य आहे तर जीवात्माच शर आहे हें म्हणणें असमंजस आहे. म्हणून आत्मा ह्याचा अर्थ बुद्धि असा घेतला पाहिजे आणि तसा अर्थ होऊंहि शकतो. "तद्विज्ञानेन परिपश्यंति" ह्या पुढील वचनांत "विज्ञान" म्हणजे बुद्धि हेंच साधन सांगितलें आहे. ह्या तीन गोष्टी लक्षांत ठेवल्यास ह्या दोन श्लोकांचा भावार्थ असा होतो की "जागृति, स्वप्न व निद्रा ह्या धनुष्यरूपी तीन अवस्थांस शररूपी बुद्धि लावून म्हणजे बुद्धीने ह्या तीन अवस्थांचा विचार करून, जीवावस्थेंतील म्हणजेच जागृतींतील पूर्णानंद वेधावा, म्हणजे तो आनंद कसा मिळेल ह्याविषयीं सिद्धांत ठरवावा व त्या सिद्धांताप्रमाणें वागावें." ह्याचा अर्थ निर्बीज समाधि किंवा योग साधा असा होत नाही. बुद्धीने जागृतींतील आनंद मिळवा असाच खरा अर्थ होतो व तोच पुढील श्लोकांत स्पष्टपणें सांगितला आहे.

मुंडक २, खंड २, श्लोक ५

यस्मिन् द्यौः पृथिवी चांतरीक्षमोतं ।
मनः सह प्राणैश्च सर्वैः ॥
तमेवैकं जानथ आत्मानमन्या वाचो
विमुंचथामृतस्यैष सेतुः ॥५॥

अर्थ—आकाश, अंतरीक्ष, पृथिवी, मन आणि सर्व इंद्रियें [प्राणैः] ज्या सूत्ररूपी जीवात्म्यांत ओवलेलीं आहेत (असें म्हणण्याचें कारण जीवस्थितींतच तीं दिसतात व इतर वेळीं नसतात) त्या एका जीवात्म्यालाच जाणून घ्या. इतराविषयीं म्हणजे अनाविष्कृत ब्रह्माविषयीं बोलूं नका. कारण हा जीवात्माच परमानंदाचा [अमृतस्य] सेतु (पूल) आहे. ॥५॥

टिप्पणें—भावयुक्त आनंद जीवावस्थेंतच संभवतो. अनाविष्कृत ब्रह्मावस्थेंत म्हणजे निद्रावस्थेंत किंवा निर्बीजसमाधींत परमानंद असला तरी त्याचें तेव्हां भान किंवा ज्ञान नसतें म्हणून आणि निद्रा ही प्रत्येकास प्रयत्नाशिवाय प्राप्त होतेच; म्हणून त्या अनाविष्कृत ब्रह्माविषयीं बोलण्यापासून कांही फायदा नाही व बोलतांहि पण येणार नाही. कारण तें बहुतांशीं अज्ञेयच आहे. कठ वल्ली ३ । २ ह्यांतहि असेंच सांगितलें आहे. "यस्मिन् द्यौरंतरीक्षमोतम्" इत्यादि वचन जीवासच लागतें, अनाविष्कृत ब्रह्मास लागत नाही; कारण जीवस्थितींतच द्यौः वगैरे दिसतात, अनाविष्कृत ब्रह्मस्थितींत तीं दिसत नाहीत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडक २, खंड २, श्लोक ६

अरा इव रथनाभौ संहता यत्र नाड्यः ।
स एषोऽन्तश्चरते बहुधा जायमानः ॥
ॐ इत्येवं ध्यायथ आत्मानम् ।
स्वस्तिवः पराय तमसः परस्तात् ॥६॥

अर्थः—रथाच्या चाकाच्या नाभीच्या ठिकाणीं चाकाच्या अरा येऊन मिळतात, त्याप्रमाणेच नाडी जेथे येऊन मिळतात त्या आंतील ठिकाणीं [अंतः] अनेक प्रकारें प्रगट होत बहुधा [जायमानः] तो फिरतो त्या आत्म्याचा तो ॐ आहे म्हणजे जागृति, स्वप्न व निद्रा ह्या अवस्था धारण करणारा आहे हें लक्षांत ठेवून [ॐ इत्येवं] विचार करा, अशाकरिता की त्या विचाराने तुम्ही अज्ञानदुःखरूपी अंधकाराच्या पैलतीरास जावें. तुमचें कल्याण असो. ॥६॥

टिप्पणें—"नाडी" ह्याचा अर्थ रक्तवाहिन्या किंवा कर्मतंतु व ज्ञानतंतु (nerves) असाहि करतां येईल. पहिला अर्थ केला तर हृदय म्हणजे छातींतील रक्ताभिसरणेंद्रिय असा अर्थ होईल. "नाडीचा" दुसरा अर्थ केला तर हृदय म्हणजे डोक्यांतील मेंदु असा अर्थ होईल. आत्मा मेंदूत राहतो हेंहि ज्ञान तेव्हा झालें होतें असें तैत्तिरीयोपनिषत् १ । ६ ह्यावरून दिसते. (तेथील आमचें विवरण पहा). कोणताहि अर्थ केला तरी श्लोकाचा भावार्थ तोच राहतो. त्यांत बदल होत नाही.

पराय = पाराय = पैलतीरास जाण्याकरितां.

मुंडक २, खंड २, श्लोक ७

यः सर्वज्ञः सर्वविद् यस्यैष महिमा भुवि ।
दिव्ये ब्रह्मपुरे ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः ॥
मनोमयः प्राणशरीरनेता ।
प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं संनिधाय ॥
तद्विज्ञानानेन परिपश्यंति धीराः ।
आनंदरूपममृतं यद्विभाति ॥७॥

अर्थ—जो सर्व ज्ञेय वस्तूंना जाणणारा आहे (ज्ञान जीवावस्थेंतच जागृतींतच संभवतें म्हणून असें म्हटलें आहे.) व जो सर्व वस्तूंना मिळविणारा म्हणजे सर्व भोग्य वस्तूंचा उपभोग घेणारा आहे.

[सर्वविद्–विद् हें विन्दतिचें रूप मानावें], ज्यांचा महिमा म्हणजे मोटेपणा ह्या पृथ्वीवर [भुवि] त्याच्या बुद्धीने निर्माण केलेल्या कलाकौशल्यादि कृतीच्या रूपाने [एष] दिसून येतो, तो, ह्या दिव्य ब्रह्मपुरांत म्हणजे शरीरांत, अंतस्थ खोल भागांत [व्योम्नि] बसलेला आहे. (मनोमय, प्राण व शरीर ह्यास चालविणारा तो अन्नमय शरीरांत हृदय म्हणजे मेंदू ठेवून बसलेला आहे.) जो आनंदरूप आणि अविनाशी [अमृतम्] दिसतो [विभाति] त्याला शहाणे लोक बुद्धीने [विज्ञानाने] पाहतात. म्हणजे जीवात्मा आनंदरूप आणि अविनाशी आहे असें शहाणे बुद्धीने पाहतात. (बुद्धीने पाहणें म्हणजे जागृतींत पाहणें हें उघड आहे.)

टिप्पणें—"सर्वज्ञ, सर्वविद्"–निद्रेसारख्या अनाविष्कृत ब्रह्मस्थितींत कोणतेंच ज्ञान किंवा उपभोग नसतो. ज्ञान किंवा उपभोग जीवावस्थेंत जागृतींतच असतो, म्हणून जीवाला सर्वज्ञ आणि सर्वविद् म्हटलें आहे. सर्वज्ञ म्हणजे सर्व विद्या जाणणारा व सर्वविद् म्हणजे म्हणजे सर्ववस्तू मिळविण्याची शक्ति ज्यांत आहे तो, असे अर्थ येथे नाहीत. ह्या अर्थाने ते शब्द ईश्वरास गौणार्थाने लावतां येतील. परंतु येथे "मनोमयः" आणि "यस्यैष महिमाभुवि" ह्या विशेषणांवरून हें जीवाचें वर्णन आहे हें निश्चित असल्यामुळे सर्वज्ञ आणि सर्वविद् ह्यांचे अर्थ निराळे करावे लागतात.

"यस्यैष महिमा भुवि"—जीवाने बुद्धीने ह्या पृथ्वीवर घरें, राजवाडे, शेतें, रस्ते, पूल, गाड्या, विमानें, कपडे, वगैरे निर्माण करून ठेवले आहेत, त्यावरून जीवाचा महिमा दिसून येतो व तो ह्या पृथ्वीवरच दिसतो, आकाशांत नाही म्हणून हें विशेषण जीवालाच लागूं शकतें. श्री शंकराचार्यांनी "भुवि" म्हणजे "लोके" असा अर्थ केला आहे. तो चूक आहे. कारण भूर् भुवर् स्वर असे तीन तरी लोक प्रसिद्ध आहेत व त्यांपैकीं एकाचाच वाचक असा "भू" शब्द येथे योजला असतां तो सर्वलोकवाचक मानणें बरोबर नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ब्रह्मपुर— ब्रह्म शरीरांतच जीवरूपाने आविर्भूत होतें म्हणून त्यास ब्रह्मपुर म्हटलें आहे. ऐतरेयोपनिषदांतहि १।८ येथे त्यास ब्रह्मगिरि असें म्हटलें आहे. छांदोग्यांत ८।१ येथेहि त्यास ब्रह्मपुर म्हटलें आहे व त्यांतील "आकाशांत" जीव राहतो असें म्हटलें आहे.

मुंडक २ खंड २ श्लोक ८

भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यंते सर्वसंशयाः ।
क्षीयंते चास्यकर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥८॥

अर्थ—पर म्हणजे अत्यंत पलीकडचे व अवर म्हणजे अत्यंत अलीकडचे म्हणजे पर पुरुष आणि महत् म्हणजेच अनाविष्कृत ब्रह्म व आविष्कृत ब्रह्म म्हणजे जीव हीं दोनहि रूपें धारण करणाऱ्या [परावरे] त्या जीवाला मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणे पाहिलें असतां म्हणजे तो आनंदरूप व अविनाशी आहे असें पाहिलें असतां सर्व हृदयग्रंथींचा म्हणजे वासनांचा नाश होतो, सर्व संशयांचा म्हणजे जगांत दिसणारें द्वैत खरें आहे ह्या अज्ञानाचा नाश होतो, आणि त्याचीं सर्व कर्में क्षीण होतात म्हणजे त्यांचीं कर्में वासनारूपी फळें उत्पन्न करूं शकत नाहीत किंवा (व्याससूत्र ३।४।१६ "उपमर्दं च" ह्यांत अर्थ केला त्याप्रमाणे) आवश्यक कर्तव्यकर्में कमी होतात म्हणजेच त्याला वेदांमध्ये सांगितलेलीं यज्ञकर्में करण्याची गरज राहत नाही. ॥८॥

टिप्पणें—परावरे-पर आणि अवर म्हणजे काय तें कठ ३।१०-११ ह्यावरून समजतें.

मुंडक २ खंड २ श्लोक ९

हिरण्मये परेकोशे विरजं ब्रह्म निष्कलम् ।
तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिः तद्यदात्मविदो विदुः ॥९॥

अर्थ—आंतमध्ये असलेल्या [परे] सोन्याप्रमाणे चकाकणाऱ्या कोशांत म्हणजे डोक्यांतील मेंदूंत पापरहित (विरजम्) आणि ज्याला कला म्हणजे भाग किंवा अंश नाहीत म्हणजे ज्याचे भाग पाडतां येत नाहीत असें ब्रह्म आहे. तें शुभ्र म्हणजे आनंदरूपी प्रकाशाने प्रकाशणारें आहे. आणि तें सर्व प्रकाशणाऱ्या वस्तूंना (ज्योतिषां) प्रकाशित करणारें आहे. म्हणजे प्रकाशणाऱ्या सूर्यचंद्रादि वस्तूंचें ज्ञान देखील त्याच्या प्रकाशाशिवाय होत नाही असें तें आहे. आत्मवेत्ते ज्याला जाणतात तें हेंच जीवरूपी ब्रह्म होय. ॥९॥

टिप्पणें—हें वर्णन जीवात्म्याचेंच होय हें उघड आहे. कारण, जीवाच्या जागृतावस्थेंतच सर्व वस्तूंवर जीवाचा प्रकाश पडतो तेव्हाच सर्व वस्तू दिसतात. पुढील श्लोकांत हेंच स्पष्टपणें सांगितलें आहे. शिवाय मेंदूंत राहतो असें जीवाविषयींच म्हणतां येतें, कारण अनाविष्कृत ब्रह्म सर्वत्रच आहे.

निष्कलम्—ह्या विशेषणाचा हेतु, एका शरीरांतील जीवात्मा दुसऱ्या शरीरांतील जीवात्म्याहून भिन्न नाही असें दाखविण्याचा आहे असें वाटतें. किंवा सर्व जगांत जेवढें ब्रह्म आहे तेवढेंच एका शरीरांतहि आहे हें दाखविण्याकरिता हा शब्द योजला असेल. मुंडक ३, खंड १, श्लोक ८ चा अर्थ व त्यावरील टिप्पणें पहा.

मुंडक २ खंड २ श्लोक १०

न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं ।
नेमाविद्युतो भांतिकुतोऽयमग्निः ॥
तमेवभांतमनुभाति सर्वम् ।
तस्यभासा सर्वमिदं विभाति ॥१०॥

अर्थ—त्या जीवात्म्यावर [तत्र] सूर्य, चंद्र, तारे किंवा वीज प्रकाश पाडूं शकत नाही, मग हा अग्नि कोठून प्रकाश पाडील ? हा जीवात्माच जागृतींत प्रकाशतो तेव्हाच [अनु] ते सर्व प्रकाशतात. त्याच्याच प्रकाशामुळे ह्या जगांतील सर्व वस्तूंचें ज्ञान होतें.

टिप्पणें—शब्दशः हाच श्लोक कठवल्ली ५।१५ मध्ये आहे. पण संदर्भभिन्नत्वामुळे तेथे त्याचा अर्थ थोडा भिन्न आहे. तेथे अनाविष्कृत ब्रह्मस्थितींतील परमसुख भासतें किंवा भासत नाही हें जाणतां येत नाही, ह्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ तो श्लोक दिला आहे. येथे जीवात्माच खरोखर सर्व प्रकाशमान वस्तूंना प्रकाशविणारा आहे, हें मागील श्लोकांतील विधान [ज्योतिषां ज्योतिः] पटवून देण्याकरिता, हा श्लोक दिला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडक २ खंड २ श्लोक ११

ब्रह्मैवेदममृतपुरस्तात् ।
ब्रह्मपश्चात् ब्रह्मदक्षिणतश्चोत्तरेण ॥
अधश्चोर्ध्वं च प्रसृतम् ।
ब्रह्मैवेदं विश्वमिदं वरिष्ठम् ॥११॥

अर्थ—हें जीवरूपी अविनाशी किंवा आनंदरूप [अमृत] ब्रह्मच पूर्वेस, पश्चिमेस, दक्षिणेस, उत्तरेस, खाली आणि वर अशा सहाहि दिशांकडे पसरलेलें आहे. हें विश्व जीवरूपी वरिष्ठ ब्रह्मच होय. ॥११॥

टिप्पणें—सर्व शरीरांत एकच जीव आहे हा ह्या श्लोकांचा भाव आहे. ह्याचा हेतु हाच आहे की स्वतःशीं जसें आपण वागूं तसेंच इतर सर्वांशीं वागावें.

वरिष्ठं—"सदसद्वरेण्यं" ह्याचा अर्थ तोच "वरिष्ठ" ह्याचा आहे. जीवात्मरूपी ब्रह्मच अनाविष्कृत ब्रह्मापेक्षा वरिष्ठ आहे कारण जीवावस्थेंतच सर्व वस्तूंचें विशेषतः सुखाचें ज्ञान होतें.

मुंडक ३ खंड १

मुंडक ३ खंड १ श्लोक १-३

द्वा सुपर्णा सयुजा सखाया ।
समानं वृक्षं परिषस्वजाते ॥
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्ति ।
अनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥१॥
समाने वृक्षे पुरुषोनिमग्नः ।
अनीशया शोचति मुह्यमानः ॥
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशम् ।
तस्य महिमानमिति वीतशोकः ॥२॥
यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णम् ।
कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् ॥
तदा विद्वान् पापपुण्ये विधूय ।
निरंजनः परमं साम्यमुपैति ॥३॥

अर्थ—ईश आणि जीव हे दोन, मित्र असलेले व नेहमी एकत्र राहणारे [सयुजा] पक्षी शरीररूपी एकाच [समानं] झाडावर बसले [परिषस्वजाते]. त्यांपैकी एक म्हणजे जीव हा पिप्पळाचीं गोड फळें खातो म्हणजे कर्मांपासून मिळणाऱ्या सुखांचा अनुभव घेतो तथापि तो दुर्बलच आहे. दुसरा म्हणजे ईश तीं फळें खात नसूनहि बलवान् आहे [अभिचाकशीति]. ॥१॥ एकाच झाडावर असून देखील जीव दुर्बलत्वामुळे [अनीशया] बुडालेला [निमग्नः] मोह पावून शोक करतो. परंतु त्याच झाडावर बसलेल्या अर्थात् नेहमी जीवाबरोबर राहणाऱ्या [जुष्टम्] दुसऱ्याला म्हणजे ईशाला जेव्हा तो पाहातो, तेव्हा तो शोक टाकून देऊन त्या ईशाच्या मोठेपणाला प्राप्त होतो [इति = "एति" किंवा "अयति" आर्षप्रयोग]. ॥२॥ जेव्हा पाहणारा [पश्यः] जीव, सोन्याचा वर्ण म्हणजे आनंद हाच ज्याचा वर्ण म्हणजे तेज आहे, जो जगांत होणाऱ्या सर्व क्रिया करणारा आहे [कर्तारम्], जो ईश्वर म्हणजे सर्वांवर सत्ता चालविणारा आहे, जो सर्व जगाचें उत्पत्ति-स्थान आहे [योनिम्], त्या सर्वांच्या शरीरांत राहणाऱ्या [पुरुषम्] ब्रह्माला पाहतो, तेव्हा, तो शहाणा होऊन [विद्वान्] पाप व पुण्य या दोहोंचाहि त्याग करतो म्हणजे ह्या दोहोंपासून मुक्त होतो व निरंजन म्हणजे वासनारहित होऊन त्या ब्रह्माशीं अतिशय समानतेला प्राप्त होतो. ॥३॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फाशीपूर्वी खुदीराम बोस

[प्रस्तुत कविता १९१८ च्या सुमारास मजहून मोठ्या असलेल्या विद्यार्थ्यांच्या नित्य गुणगुणण्यांत असलेली मला प्रथम आढळली व तेव्हाच मलाहि ती पाठ झाली. खुदीराम बोस हा सुप्रसिद्ध क्रांतिकारक १९०८ मध्ये फाशी गेला. फाशी जाण्यापूर्वी त्याने जे धीरोदात्त वर्तन केलें व त्या प्रसंगीं त्याचा व त्याच्या वकिलाचा जो भाषणप्रसंग झाला तो या कवितेंत वर्णिला आहे. ही कविता या प्रसंगानंतर लौकरच केव्हा तरी लिहिली गेली असली पाहिजे. परंतु ती आजतागायत कोठेहि प्रसिद्ध झाल्याचें मला स्मरत नाही. (त्या वेळी अशा कविता प्रसिद्ध करणें गैर-सोईचेंहि होतें). तसेंच या सुंदर कवितेचा कवि कोण तेंहि अज्ञात आहे. संशोधकांना हा एक विषय आणि चार तपांपूर्वीच्या अप्रसिद्ध उदात्त कवितेचा एक नमुना या दोन्ही दृष्टींनी, माझ्या आठवणींतून ही कविता येथें प्रथमच प्रसिद्ध करीत आहें. शीर्षक मी दिलें आहे. या कवितेसंबंधी विशेष माहिती कोणास असल्यास कळवावी—संपादक.]

(चाल—केशवकरणी)

वकील—

भयाण दुर्धर मरणकाल हा उदास तुज का गमे।
कोमल चित्त भीतिने श्रमे ?

खुदीराम—

देशकारणीं मरणयोग हा विजय महोत्सव मला ।
पूर्वज पुण्यबलें लाधला

वकील—

मधुर मनोहर तारुण्याचे किरण दिसूं लागले ।
तोंच हें अदय दैव कोपलें !

हें यौवन केवळ प्रसन्न उपवन कळी
ही आनंदाची मूर्तचि बा ओतली
बा मूर्तिमंत ही ईशकृपा साउली

खुदीराम—

अनुपम सुखमय यौवन जरि हें ईशचरणिं वाहिलें ।
कैचें भाग्यहीन जाहलें ? ॥

वकील—

भेसुर भीषण वधस्थलातें बघण्या मन विकलतें ।
कंप का बालहृदय पावतें ?

खुदीराम—

रजपूतांच्या स्त्रिया चितेवरि हर्षे चढल्या जिथे ।
लांछवूं देवभूमि केवि ते ?

वकील—

अघम अमंगल पाप निधन हें काय तुला वाटतें ।
होतें शंकित मन काय तें ?

खुदीराम—

हें स्वातंत्र्याचें समरकुंड पेटलें
निजदेशतारणीं प्राण त्यांत टाकले
निजधर्मपालनीं मरण उचित मानलें

ईशपदाची सेवा घडली भाग्य दुजें कोणतें ।
धन्यचि जीवित हें वाटतें ॥

वकील—

आस उरलि कां गुंतुनि मन हें कवण्या वस्तूवरी ।
कोणा निरोप कांही तरी ? ।

खुदीराम—

जग हें नश्वर केवळ मृगजळ लोभ कशाचा तरी ।
धरावा गुंतुनि मोहान्तरीं ।

परम मंगला कालिदेविचा प्रसाद द्यावा तरी ।
नेइ जो भवसागर परतिरीं ।

निजदेशबांधवा हीच एक मागणी
स्वातंत्र्यसंगरीं मरा हटा ना कुणी
हा देश चढावा वैभव सिंहासनीं

पुनरपि भेटी घडेल येथे निश्चय हा अंतरीं ।
पुरवो आस सखा श्रीहरी ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राचीन विदर्भाचें काव्य

श्री. नारायण नागोराव हूड

[लेखांक २ रा]

अव्याप्त व्याख्या

भक्ति (भक्तीचा आनंद) हें काव्याचें मूळ आहे, हा सिद्धांत खरा मानला (आणि पुढे लेखांत विवेचन केलेल्या मुद्यावरून तो खरा ठरण्यासारखा आहे) तर येथे एक शंका सहजच उद्भवते. काव्याच्या अनेक व्याख्या सर्वच वाङ्मयांत झालेल्या आहेत. त्यांत संस्कृतमधील ' वाक्यं रसात्मकं काव्यम् ' व वर्डस्वर्थची Spontaneous overflow of powerful feeling... या व्याख्या सर्वोत्कृष्ट आहेत. ' वाक्यं रसात्मकं काव्यम् ' ह्या व्याख्येंत छंदाचीहि काव्याला जरूरी नाही, हें ध्वनित केलेलें आहे, तेंहि अगदीच योग्य आहे. या तीन शब्दांत काव्याचें संपूर्ण लक्षण सांगितलें, यावरून प्राचीन शास्त्रकारांनी यासंबंधी केवढा खोल विचार केला होता, हें सहज लक्षांत येतें. पण काव्याचें व्यवच्छेदक मूळ, जी भक्ति ती वरील व्याख्येंत कोणत्याच शब्दानें ध्वनित सुद्धा केली नाही ! काव्यांत रस असला पाहिजे, हें कोणीहि मान्य करील, त्याशिवाय काव्य या संज्ञेला कोणतेंहि लिखाण मान्य होणार नाही हें उघड आहे. पण काव्यांत नुसता रस हाच आवश्यक आहे काय ? सर्व भाषेंतील श्रेष्ठ काव्यांत कोणता ना कोणता तरी तात्त्विक दृष्टिकोन व्यक्त झालेला असतो. निदान प्रत्यक्ष नसेल तर तत्वज्ञानाची एकादी तरी सूक्ष्म छटा अंतर्भूत वा अनुस्यूत असलेली दिसून येते. तत्त्वज्ञान वा तात्त्विक छटा असून जर कांहीच रस नसेल, तर केवढयाहि महत्त्वाच्या तत्वज्ञानामुळे तें काव्य होणार नाही हें तितकेंच खरें आहे. पण ' नुसती रसयुक्त तेवढींच काव्यें ' असें म्हटलें तर किती तरी श्रेष्ठ काव्यें या व्याख्येंत, तींतील अव्याप्तीमुळे बसूं शकणार नाहीत. कांही काव्यांत रसाचा भाग अगदीच थोडा असला तरी, त्यांतील विचारामुळे तीं काव्यें मोह पाडीत असतात. केशवसुतांच्या वगैरे 'झपूर्झा' 'प्रतिभा' इत्यादि अनेक काव्यांत कोणता रस प्रामुख्यानें आहे ? तरीहि त्या कविता काव्यें नाहीत असें कोण म्हणेल ? आधुनिक मराठी भाषेंतील दहा उत्कृष्ट काव्यें निवडावयास सांगितलीं, तर त्यांत केशवसुतांच्या 'प्रतिभा' या चतुर्दशकाची मी प्रामुख्यानें गणना करीन ! भगवद्गीतेसारख्या सर्वश्रेष्ठ काव्यांत, रसापेक्षा, तींतील तत्वज्ञानाचा प्रभाव अनेक पटीनें जास्त आहे. रसाप्रमाणेच तत्त्वज्ञान हें काव्याचें एक महत्वाचें अंग आहे. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' या व्याख्येंत तत्त्वज्ञानास अंगभूत स्थान नाही. रसाशिवाय व भावनेशिवाय काव्यांत कांही अधिक आहे, तें म्हणजे तत्त्वज्ञान किंवा विचार (thought) इत्यादि कारणाकरतां या व्याख्येंत कांही तरी थोडीशी कमतरता (अव्याप्ति) राहून गेलेली आहे असें भासतें.

वर्डस्वर्थच्या ' Poetry is the spontaneous overflow of powerful feeling recollected in tranquility ' या व्याख्येंत, तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोनाविषयी, (तेंहि काव्याचें एक आवश्यक लक्षण आहे, या दृष्टीनें) कांही सांगितलेलें नाही. काव्याचें मुख्य व्यवच्छेदक लक्षण जें भक्ति तें ध्वनित करणारा एखादा शब्दहि नाही. काव्याचीं लक्षणें निरनिराळया भाषेंत निरनिराळया तऱ्हेने विशद केलीं असतील; पण जें मूलगामी व्यवच्छेदक लक्षण आहे तें सर्वच भाषेंतील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्याला लागू व्हावयास पाहिजे. त्या व्याख्येंला 'ending in some philosophy' or having a tinge of philosolphic thought अशा अर्थाचे कांही तरी योग्य शब्द पाहिजेत असें वाटतें. Feeling याचा अर्थ, इतर अर्थाबरोबर Experience असा दिला असला तरी Feeling व Experienee यांत सूक्ष्म फरकाच्या छटा आहेतच. Feeling हा शब्द साधारणत: स्पर्शानें होणाऱ्या जाणीवेबद्दल वापरतात (Esp. sense of touch) व साधारणत: आनंद, राग, क्रोध, लोभ अशा मनोविकारांचा (emotion–excitement of Hope, fear etc. or excitement of pleasure and pain etc.) तो दर्शक आहे. Experience हा शब्द 'Phase of religious emotion' (अनुभव प्रतीति) व्यक्त करतो. त्यामुळे त्या संबंधीचें तात्विक काव्य जें असतें, त्याचा समावेश या व्याख्येंत तितकासा होऊं शकत नाही. Feeling मध्ये Intuition (साहजिक ज्ञान) belief (श्रद्धा) इत्यादिकांचा अंतर्भाव होतो त्याचप्रमाणें 'conviction not based on reason' हेंहि त्यांत येऊं शकतें; पण Thought (sober reflection किंवा meditation) याचा अर्थ येत नाही. त्याचेंच काव्यांत किती महत्व आहे, हें ब्राउनिंगच्या 'The man's a Browning he neglects the form, but Oh! the thought—the mighty thought या उद्‌गारावरून स्पष्ट होतें विचार हा काव्याचें एक फार मोठें महत्त्वाचें अंग आहे हें दिसून येईल. बायबल व गीता हीं जगांतील अतिशय उत्कृष्ट काव्यें आहेत. त्यांत 'Mighty thought' आहे. बायबल किंवा गीता हीं वर्डस्वर्थच्या व्याख्येप्रमाणें नुसतें powerful feeling च आहे काय? 'बायबल' व गीता हें 'revealation' आहे. Revealation इतकें दुसरें कोणतें काव्य उत्कृष्ट असूं शकेल? उत्कट भावना हें काव्याचें प्रमुख अंग आहे; तें नसेल तर काव्यच होऊं शकत नाही हें खरें आहे पण तेवढेंच असलें तर त्याला पूर्णतया काव्य म्हणतां येईल काय? इतरहि दृष्टीनें ही व्याख्या विचार करण्यासारखी आहे.

विरोधी भाग

शिवाय ज्या वेळीं प्रसंग घडला किंवा अनुभव आला, त्या वेळीं Feeling (जाणीवज्ञान) प्रबल राहूं शकेल की त्यानंतर बऱ्याच कालानें? सौख्याचा वा दु:खाचा अनुभव आल्यानंतरच कोणी एकदम कागद पेन्सिल हातीं घेऊन काव्य करीत नाही, हें जरी खरें असलें, तरी जसजसा काळ जातो तसतसें 'Feeling' कमीकमी प्रबल होत जातें हेंहि तेवढेंच खरें आहे. कित्येक वेळेला तर असें होतें की, अनुभव आल्यावरोवर किंवा प्रसंग घडल्याबरोबर जर तो लिहून काढला नाही, तर त्या प्रसंगाच्या वा अनुभवाच्या सूक्ष्म छटा स्वप्नाप्रमाणें विरून गेल्यासारख्या वाटतात. मनांत विचार येतांच तात्काळ ग्रथित झाले नाहीत तर केशवसुतांच्या 'क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास' या काव्यांत वर्णन केल्याप्रमाणें ते नाहीसे होतात; व त्या कविता पुढे बहुतेक पुऱ्या होत नाहीत.

ज्या वेळेला अनुभव ताजे व प्रबल असतात, त्याच वेळीं भावना किंवा जाणीवज्ञान जास्त उचंबळून येतें. त्याच वेळीं कविता सहज (spontaneous) लिहून होईल असें वाटतें. पाहिजे तर त्या कवितेचें संस्करण कवीनें मागाहून दीर्घकाल करीत रहावें. प्रबल मनोवृत्ति व्यक्त करण्याला एकांताच्या शांततेच्या काळाचीच जरूरी आहे काय? Tranquility' बाह्य परिस्थितीची की मनाची? मनाची शांत स्थिति असतां मन:प्रवृत्ति उचंबळून (overflow) येऊन काठोकाठाच्या वर कशी वाहूं शकेल? (Recollected) याचा अर्थ मुद्दाम आठविण्याचा प्रयत्न करून (succeeded in remembering) असा होतो. मुद्दाम आठवून काव्य लिहिलें, तर त्याला प्रबल मनोवृत्ति (Powerful feeling) व सहज, निसर्गत: आपोआप (Spontaneous) असें म्हणतां येईल काय? ज्यावेळचें त्यावेळेला किंवा अगदीच, थोडक्या काळा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर लिहिण्यांत आलें तर 'Recollect' करण्याचें कारणच पडणार नाही.

कित्येक कवितेमध्ये 'Feeling' विशेष 'powerful' नसतें, तें 'Spontaneous' हि नसतें व त्यांत 'overflow' हि नसतो. त्या 'Feelnig'चें शिल्प वर्षानुवर्षाच्या अखंड ध्यासांतून हळूहळू साकार होत असतें व तींच काव्यें कदाचित जगाला जास्त शाश्वत व तारक होतात. उदाहरणार्थ, ग्रेची 'Elegy in country churchyard' ही कविता कांही Spontaneous overflow of feeling नाही. या काव्यांत feeling powerful आहे एवढें मात्र खरें.

कांही वेळेला 'Feeling powerful' नसूनहि चांगल्या ओळी सुचूं शकतात. (कदाचित न आठविण्याचा प्रयत्न करूनहि.) म्हणून वर्डस्वर्थचें हें वाक्य काव्याची व्याख्या नसून, काव्याच्या व्याख्येचें सर्वोत्कृष्ट वर्णन आहे, असें वाटतें !

मात्र ही वर्डस्वर्थची व्याख्या काव्याला ज्या गोष्टी अत्यंत जरूरीच्या आहेत, त्या साऱ्या जास्तींत जास्त चांगल्या तऱ्हेने प्रकट करूं शकते यांत शंकाच नाही !

'Spontaneous' (नैसर्गिक, आपोआप) 'Overflow' (उचंबळणे) 'powerful' (प्रबल) Feeling (जाणीवज्ञान) Recollect (प्रयत्न करून स्मरणें) 'Tranquility' (शांतता किंवा एकांत) यांत काव्याच्या व्याख्येपैकी बहुतेक सर्व कांही आलेलें आहे. 'Tranquility'त चिंतनाची छटा ध्वनित झालेली आहे. म्हणून कदाचित त्यांत तात्त्विक कवितांचा अंतर्भाव करतां येणें शक्य आहे असें वाटेल. पण वाक्याचा पहिला भाग Spontaneous overflow (नैसर्गिकपणे उचंबळून येणारा) व त्यानंतरचा दुसरा recollected in tranquility (प्रयत्न करून आणि शांततेंत) हे परस्परविरोधी वाटतात. पहिला भाग भावनात्मक काव्याला लागूं आहे असें वाटतें, तर दुसरा भाग चिंतनात्मक काव्याला लागूं आहे असें वाटतें ! नैसर्गिक प्रबल असा भावनाप्रवाह असला तर त्याला शांततेची जरूरी काय? किंवा तो उचंबळणारा प्रवाह शांततेची वाट थोडीच पाहात बसणार? व जर तो तसा वाट पाहात असेल तर त्याला प्रबल व उचंबळून येणारा प्रवाह असें कसें म्हणतां येईल? शिवाय या संपूर्ण वाक्यावरून 'Spontaneous', 'Overflow' 'powerful' 'Recollected' इत्यादि शब्द समुच्चय विशेषतः Feeling संबंधीचे आहेत. त्यामुळे त्याचा वेगवेगळा अर्थ घेतां येणार नाही. व Feeling हा शब्द त्यांतल्यात्यांत फार उत्कृष्ट असला, तरी कांही काव्याच्या वेळीं असलेली मानसिक स्थिति त्यांत पूर्णांशाने व्यक्त होणारी नाही असें वाटतें. यासंबंधी विस्तृत विवेचन मी उदाहरणें घेऊन एका लेखांत केलेलें आहे. तें स्थलाभावास्तव येथे देतां येत नाही.

आकर्षण व मीलन

वरील, काव्याच्या सर्वोत्कृष्ट सुद्धा व्याख्या, तात्त्विक व अमूर्त काव्याच्या बाबतींत थोड्याबहुत अव्याप्त कशा पडतात, हें दाखविल्यानंतर विदर्भीय संत काव्याचे कोणते महत्त्वाचे विशेष दिसून येतात, याचा विचार करून, नंतर ते विशेष कोणत्या प्रमुख कवींत कुठे व कसे प्रतीत होतात याची चर्चा करूं.

विदर्भीय संत काव्य श्रेष्ठ प्रकारचें आहे याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे, त्या काव्याला अपरोक्षाची किंवा तत्वज्ञानाची बैठक आहे; एवढेंच नव्हे तर तें त्या काव्याचा गाभा किंवा प्राणच आहे. त्यांच्या तत्वज्ञानाचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आहे. कित्येक नवकाव्यांमध्ये छंद, तंत्र वगैरे व प्रतिमासृष्टि नवीन आणली असें सांगण्यांत येतें, तें खरेंहि असेल; पण कोणत्याहि स्पष्ट, मूलगामी व नवीन दृष्टिकोणाशिवाय छंद, तंत्र व प्रतिमासृष्टि यांचें फारसें महत्त्व नाही !

वैदर्भीय काव्याचें हें तत्त्वज्ञान म्हणजे अद्वैतवाद व भक्तिवाद. त्या काव्यावर कोठेहि दृष्टि टाका. मूळ नादांतून जसे झंकाराचे पडसाद निर्माण होतात, त्याप्रमाणे वरील तत्त्वज्ञानाचे तरंगच त्यांच्या कवितेंतून इतस्ततः निनादित झालेले दिसतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि विश्वांत कोठेहि पहा. अद्वैतवाद व भक्तिवादाचेंच तत्व भरलेलें दिसून येईल. सर्व विश्व जणूं काय हेंच तत्त्व सुचवीत आहे, असें भासतें ! या विराट विश्वांतील एकूण एक सर्व ग्रहगोलक वर्तुळाकारच कां ? त्रिकोणी, चौकोनी, षट्कोनी, अष्टकोनी कां नाहीत ? अशा वर्तुळाची रेषा कल्पिली असतां, तिचीं दोन्ही टोकें अगदी परस्पर विरोधी बाजूला असतात; पण पुन्हा वर्तुळ झाल्याबरोबर तीं टोकें एकाच बिंदूंत मिळतात. " ब्रह्मांडाचें विराट वर्तुळ, (परिघच किंवा) त्याचि विरोधी अंतिम टोकें, एका बिंदुंत मिळतीं पाहे " ही कल्पना मी माझ्या काव्यांत व्यक्त केलेली आहे. हें दृश्य अद्वैतवादच सुचवीत नाही कां ? म्हणून केवळ अद्वैतवाद किंवा केवळ द्वैतवाद हे सिद्धांतहि बरोबर नाहीत. (माझ्या मते याला आणखीहि अनेक कारणें आहेत.) वरच्या कल्पनेप्रमाणे रेषा सरळ असतांना जें द्वैत असतें तेंच त्याचें वर्तुळ कल्पिलें असतां अद्वैत होतें. तसाच संबंध द्वैत व अद्वैत यांचा आहे ! प्राचीन कवींनी या अद्वैतवादाच्या सिद्धांताचा जो पुरस्कार केला, तो इतका मूलगामी आहे की त्याचेंच दर्शन विश्वांत सर्वत्र झालेलें दिसतें.

त्याचप्रमाणे विराट विश्वांतील सर्व विराट ग्रहगोलांत (व चराचरांतहि) आकर्षणाचें तत्त्व भरून राहिलेलें आहे. हें आकर्षण नष्ट झाल्यास तत्क्षणींच सर्व विश्व कोसळून पडेल ! आकर्षणाचेंच दुसरें नांव भक्ति ! भक्तीशिवाय आकर्षण कसें असूं शकेल ? किंवा भक्तीमुळेच आकर्षण निर्माण होतें. जणूं काय ही सर्व सृष्टी, या वरील दोन तत्त्वांचीच झालेली आहे. (हीहि कल्पना माझ्या काव्यांत आलेली आहे.) निसर्ग व मानवी भावनांच्या एकत्रीकरणाने, कोणतीहि भावना वा विचार जास्त परिणामकारक रीतीने वरीलप्रमाणे व्यक्त करतां येतो व सृष्टिविषयक काव्याचाहि तोच श्रेष्ठ प्रकार आहे.

विदर्भ कवींनी सृष्टीच्या सौंदर्यांकडे केवळ 'सृष्टिसौंदर्य' या दृष्टीने पाहिलें नाही, व त्या दृष्टीचें सृष्टिसौंदर्याचें चित्रीकरण त्यांच्या काव्यांत बहुधा दिसत नाही. मुक्तेश्वराच्या कांही काव्यांत, त्याचप्रमाणे महानुभावीय वाङ्मयांत ('शिशुपालवध', नरेंद्राचें 'रुक्मिणीस्वयंवर' 'ऋद्धिपूरवर्णन', इत्यादिकांत) सृष्टिसौंदर्याचीं चांगलीं वर्णनें आहेत. पण इंग्लिश काव्याप्रमाणे, सृष्टिघटनांमध्ये आपल्या भावना मिसळून, स्वतःला आनंद झाला म्हणजे सृष्टि आनंदी दिसणें, किंवा दुःख झालें असतां सृष्टि दुःखी दिसणें (pathetic fallacy) या पद्धतीचें सृष्टिवर्णन वैदर्भीय काव्यांत विशेष दिसत नाही. सृष्टिसौंदर्य किंवा इतर सौंदर्याचें सारें सार त्यांनी 'घ्यारे उलट । कमलमुख पलट । देखले मौजा । सग घटमो नाथ बिराजा ।' या काव्युक्तिवर्णित वृत्तीमध्येच पाहिलें. सृष्टिसौंदर्याचीं चित्रें त्यांनी आपल्या काव्यांत रंगविलीं नसलीं तरी अंतिम सत्तेचें परम सौंदर्यमय स्वरूप त्यांनी आपल्या काव्यांत चित्रिलेलें आहे.

तसेंच म्हटलें तर मनुष्य हा सृष्टीचाच अविभाज्य घटक असल्यामुळे, त्याच्या जीवनांत व काव्यांत सृष्टीसौंदर्याचा आविष्कार सहजासहजीं व्हावा यांत नवल नाही. व तो तसा सृष्टींतील अनेक उपमारूपकांच्या पद्धतीने 'हा चित् सिंधु । ते चित् सरिता ऐक्यपणे मिळतो । खचित रवि परिपूर्ण तयाची अबाधित ते दीप्ति इ० देवनाथांच्या वगैरे काव्यांतील अनेक वर्णनावरून झालेला दिसून येतो.

अचूक आदर्श

सर्व श्रेष्ठ काव्यांचें प्रमुख कार्य विश्वांतील सत्यात्मक शिवात्मक, किंवा सौंदर्यात्मक अशा परमसत्तेचें स्वरूप ओळखून, दुसऱ्यास प्रतीत करून देणें हें आहे. चंद्रकोरीच्या नखाने ज्याप्रमाणे नभःश्रीच्या अव्यक्त पण उज्ज्वल स्वरूपाची कणशः कल्पना यावी व तें संपूर्ण स्वरूप दिसण्याचा ध्यास लागावा, त्याप्रमाणे अमूर्ताचा एकादा प्रकाशकिरण पाहिला म्हणजे त्या विश्वस्वरूपाच्या संपूर्ण सत्याच्या प्रकाशाचें तेजोमय स्वरूप आपल्याला दिसावें, हा ध्यास कविमनाला लागलेला असतो. हा ध्यास भक्तींतूनच निर्माण होतो. संत कवींनी तेंच स्वरूप पाहण्याचा व सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

व्यक्तीला व्यावहारिक (मूर्त) व अपार्थिव (अमूर्त) असे दोनहि प्रकारचे अनुभव येत असतात;

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण मूर्त अनुभवापेक्षा अमूर्त अनुभवाचा आनंद फार मोठा आहे. म्हणून व्यावहारिक, सामाजिक, राष्ट्रीय, किंबहुना मानवतावादी अनुभवापेक्षाहि अमूर्त अनुभवावरील काव्यें जास्त महत्त्वाचीं असतात. व्यावहारिक अनुभव विपुल प्रमाणावर मिळतात, अमूर्त अनुभव क्वचित मिळतात, म्हणूनहि त्याचें महत्त्व आगळें आहे !

संतांची कविता येवढी श्रेष्ठ झाली, याचें कारण म्हणजे नामदेव, एकनाथ, देवनाथ, दयाळनाथादि संतकवि हे काव्यांत जेवढे श्रेष्ठ होते, तेवढेच जीवनामध्येहि होते. त्यांचे विचार विराट व्यापक होते, म्हणून त्यांची कविताहि विराट व्यापक स्वरूपाची झाली आहे. काव्य हें कवीच्या मनाचा अचूक असा आदर्श आहे ! काव्य व जीवन यांचा घनिष्ठ (Organic) संबंध आहे. ज्या वृत्तीचा व पातळीचा कवि असेल तशीच त्याची कविता होईल. तो उदात्त वृत्तीचा असेल तर कविता उदात्त होईल, क्षुद्र वृत्तीचा असेल तर क्षुद्र होईल. एकाद्या कवीची कविता वाचून त्याच्या मनाची पातळी खऱ्या रसिकास सहज अजमावितां येते. अर्थात ती कविता त्याने प्रांजल वृत्तीने लिहिलें असेल तर, आणि त्याने प्रांजल वृत्तींतून कविता लिहिली नसेल, तर त्याला शिक्षा हीच होते की, त्याची कविता खऱ्या रसिकास केव्हाच गुंगवीत नाही व ती अल्पजीवि होते. जेवढी प्रखर भक्ति असेल तेवढी ती भक्तीची कविता उत्कट होईल. जेवढें प्रखर वैराग्य असेल तेवढी वैराग्याची कविता सामर्थ्यशाली होईल. अर्थात नुसतीच प्रखर भक्ति किंवा नुसतेंच प्रखर वैराग्य असून चालणार नाही. त्याला निर्माणक्षम प्रज्ञा पाहिजेच ! ती सर्वांतच जागृत होईल असें नाही किंबहुना ती प्रज्ञा जागृत झालेले थोडेच असतात. पण ही प्रज्ञा आत्यंतिक भक्तींतून निर्माण होते यांत शंका नाही.

संतांच्या काव्यांत विश्वव्यापी विराट प्रीति भरून राहिलेली आहे. 'हें विश्वचि माझें घर' असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले, त्याच भावनेने त्यांनी सर्व विश्वाकडे पाहिलें व कृतीहि केली. 'आधुनिक कवींमध्ये टिळकांची साधारणतः अशा तऱ्हेची कविता आहे. त्यामुळे त्यांचीं कांही भक्तिगीतें उत्कृष्ट उतरलेलीं आहेत. मानवतावादाच्या गोष्टी बोलतच आहेत, पण शेजाऱ्याचीहि विचारपूस करण्याची इच्छा होत नाही, असे प्रकार आजकाल दिसतात.'

अतिशयोक्ति व स्वभावोक्ति

लौकिकांत येऊन कवि म्हणवून मिरवावें, या दृष्टीने संतकवीनी कविता लिहिली नाही. त्यांचा मुख्य उद्देश आत्मरंगांत गुंगण्याचा होता. साधारणतः बहुतेक कवींची प्रवृत्ति काव्याच्या आनंदांत रंगून जाण्यापेक्षा, लोकप्रियता कशी मिळेल, याकडे असतो. बहुतेक वाङ्मयप्रकारांत, जडजूड, विद्वताप्रचुर बुद्धिवादी विचाराला सहृदय लिखाणापेक्षा जास्त मान्यता आहे. लोकांना न समजाणारें दुर्बोध-बोजड लिहिलें, व तें आपल्या बुद्धीपलिकडचें आहे असें त्यांना दिसलें, म्हणजे त्यांचा त्याविषयीचा आदर वाढतांना दिसतो. समाजांत बुद्धिमान विद्वान म्हणून म्हणविल्या गेलेल्या साहित्यिकाची जेवढी लोकांस महती वाटते तेवढी प्रतिभावान कवीची वाटत नाही ! एकादा विचार सरळ सरळ सोप्या भाषेत लिहिला तर त्याचें एवढेसें कौतुक केलें जात नाही. तोच तंत्रांच्या साह्याने व इतर सजावटीने व्यक्त केला तर जास्त आदरणीय वाटतो. असें कां व्हावें हें समजत नाही ! एकादा विचार वा अनुभव व्यक्त करण्यास कठीण असेल तर तो निरनिराळ्या तंत्रांच्या (Mannarisms) साह्याने समजावून सांगण्याची आवश्यकता उत्पन्न होऊं शकते, पण तो तसा कठीण नसल्यास बाह्य उपचारांची जरूरी नसावी. कित्येक वेळां आपला अनुभव वा विचार श्रेष्ठ प्रकारचा नाही, अशी कवीस जाणीव असल्यामुळे त्याला कृत्रिम तऱ्हेने रंगरूप देण्याशिवाय त्याला गत्यंतर उरत नाही असें दिसतें व त्यामुळेच कदाचित तो वर उल्लेखलेला मार्ग अवलंबीत असतो.

यामुळेच की काय कलाकवि साधारणतः अतिशयोक्तीने, व द्रष्टे कवि साधारणतः स्वभावोक्तीने लिहीत असतात !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्याची प्रक्रिया

कित्येक कवि, आज बाजारांत ज्या प्रकारच्या मालाला भाव आहे, त्या धर्तीचीं काव्यें लिहितात. नवीन व महत्वाचे अनुभव सर्वांनाच मिळणें कठीण असतें. तेव्हा ग्रंथांतील किंवा इतरत्र ऐकलेले अनुभव वा विषय घेऊन कविता लिहिल्या जात असतात. अमुक एक कल्पना त्यांत आलीच पाहिजे, मानवतावादाचें 'लेबल' त्यावर असलेंच पाहिजे, समाजाच्या तक्रारी त्यांत गोवल्याच पाहिजेत, कविता अमुक एक छंदांतच लिहिल्या पाहिजेत, असा पूर्व विचार करून त्या साच्यांत बरीचशी काव्यें बसविलीं गेलेलीं दिसतात. त्याने अमूप लोकप्रियता मिळते, पण ती टूम निघून गेली किंवा ते विषय शिळे झाले म्हणजे त्या कवितांना कोणी विचारीत नाहीत.

खऱ्या कवितेची वरीलप्रमाणे प्रक्रिया नसते. भक्तीमुळे एकादी भावना अत्युत्कट झाली म्हणजे ती छंद वगैरे घेऊन आपोआपच बाहेर पडते. पूर्वीच्या पंडित कवींनीहि गणवृत्तादींत काव्य लिहिल्यामुळे कित्येक वेळीं त्यांच्या सहज भावनांना किती अडथळा आला असेल हें लक्षांत येण्यासारखें आहे.

संत कवींच्या काव्यांत सहजता आहे व सजावट जवळ जवळ मुळीच नाही व तिची त्यांना जरूरहि पडली नाही ती वरील कारणांमुळेच !

समाजवादी काव्य आवश्यक किंवा उत्कृष्ट नसतें असें अर्थातच कोणीहि म्हणणार नाही. किंबहुना अत्युत्कष्ट भावनेने (म्हणजेच भक्तीने) रसरसलेली कोणत्याहि विषयावरील (व नवविचाराची) कविता सुंदरच असते. पण आजकाल 'तक्रारवादी' काव्य बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केवळ 'फॅशन' म्हणून होत असतें, व तें बुद्धिवादाकडे द्रुतगतीने झुकत आहे, एवढेंच मला सुचवावयाचें आहे. यासंबंधीचें जेफर्स यांचें एक लहानसें अवतरण या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ लेखांक तीनमध्ये उधृत करावयाचें आहे.

त्याचप्रमाणे संत कवींचीहि सर्वच कविता उत्कृष्ट आहे असें नव्हे. किंबहुना पहिल्यादर्जाची कविता लिहिणारे संतकवि थोडेच आहेत. संतकाव्यांतहि अनेक दोष आहेत. त्याचेंहि दिग्दर्शन पुढील लेखांकांतच करतां येईल.

'ज्ञानापासि प्रेम उत्तम !'

वरील माझ्या तीनहि काव्यांत वर्णन केलेल्या व त्यानंतर सांगितलेल्या मनोभूमिकेमधूनच विदर्भाचें प्राचीन काव्य निर्माण झालेलें आहे, असें दिसून येईल. या काव्याचे 'जिव्हार' म्हणजे भक्तींतून प्रकट झालेला आनंदच आहे. उपरोक्त कवींनी त्या विषयाचा एवढा ध्यास घेतला होता की, त्याकरता त्यांनी आपलें जीवितहि कःपदार्थ मानलें.

मुकुंदराज–मराठीचे आद्य कवि–हे तर जाणून-बुजून वैराग्यशाली म्हणजे फकिरी वृत्तीचेच होते. आतापर्यंतच्या पुढे आलेल्या माहितीवरून ते भंडाऱ्याजवळच्या अंभोरे या गावचे होते, याबद्दल शंका उरत नाही. मुकुंदराजांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार करण्याकरता ग्रंथ लिहिला नाही, तरी त्यांनी शंकराचार्यांनें प्रतिपादिलेल्या अद्वैतवादाचेंच भाष्य केलें, पण अद्वैतवाद हा दुसरें तिसरें कांही नसून, भक्तिवादाचीच अत्यंत शेवटची पातळी किंवा पायरी आहे यांत शंका नाही. भक्तिमध्यें, भक्त हा भक्तिविषयाकडे अधिकाधिक खेचल्या जातो; त्यामुळे भक्त व भक्तिविषय यांमधील अंतर कमी कमी होत जाऊन शेवटीं शून्यावर येतें व भक्त भक्ति–विषयांत संपूर्ण मिळून जातो. एवढेंच नव्हे तर तोच तो विषय होतो, तेव्हा भक्तिविषयासंबंधीचे संपूर्ण ज्ञान त्याला होतें. भक्तिमार्ग व अद्वैतमार्ग यांत मूलतः फरक नाही. भक्तीशिवाय अद्वैत होणेंच अशक्य आहे. (हें मी माझ्या काव्यांत दाखविलें आहे.) भक्तीचें अंतिम पर्यवसान अद्वैतांतच होतें.

मुकुंदराजांनी तत्वज्ञानाचा विषय घेऊन बुद्धीलाच आत्मा मानणाऱ्या बौद्धाचें, अहंकाराला आत्मा मानणाऱ्या नैय्यायिकाचें व शून्यालाच आत्मा मानणाऱ्या जैनमताचें खंडण केलें व 'स्वरूपोन्मुख स्फुरण,' (मी ज्ञानरूप आत्मा आहे असें वाटणें) हें सायुज्यतेचें लक्षण असा सिद्धांत मांडला. भक्तीच्या पुढची पायरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानस्थिति आहे किंवा भक्तींतून ज्ञान निर्माण होतें हें त्यांनी 'मनस्वरूपीं लाविजे। तेणें तेथेचि रमिजे। मग आनंदे फुंजो लागिजे। तें परि संश्लिष्टता ॥ ब्रह्मीं चित्त निःशेष नुरे। केवळ ज्ञेप्तीची उरे। तें सुलीनता ॥ या काव्यपंक्तींत ध्वनित केलेलें आहे.

ब्रह्म म्हणजे काय, परमात्मा म्हणजे काय, ईश्वर म्हणजे काय, जीव म्हणजे काय, परमेश्वर कां निर्मिला इत्यादि गूढाचें त्यांनी फार उत्कृष्ट विवेचन केलेलें आहे. अद्वैताचें श्रेष्ठत्व प्रतिपादूनहि शेवटीं मुकुंदराजाने 'मज ब्रह्मपदाची नाही चाड। तुझें भजन अत्यंत गोड' इत्यादि पद्यपंक्तींत भक्तीचें श्रेष्ठत्वच वर्णिलेलें आहे.

हें भक्तीचें श्रेष्ठत्व बहुतेक सर्व तत्वज्ञान्यांनी, श्रेष्ठ चिंतकांनी व श्रेष्ठ कवींनी मान्य केलेलें आहे. रामानुजांनी शांकरीय अद्वैत मताचा पाडाव करून विशिष्टाद्वैत व वैष्णवी दीक्षा या मताचा प्रचार केलेला असला, तरी भक्ति हाच ज्ञानाचा किंवा मोक्षाचा मार्ग आहे हें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मध्वानेहि हरिभक्तीच प्रतिपादिली. रामानंदानेहि रामसीतेची भक्ति करावी हा उपदेश केला. वारकरी सांप्रदायाने तर भक्तिमार्गावर अतिशयच भर दिलेला आहे. महानुभाव पंथ, मोक्ष हा आत्मज्ञानानेच मिळणार असें सांगत असला (व द्वैतमताचा असला) तरी 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' असें विचारमालिका (३०) इत्यादींत म्हटलेलें आहे. महानुभावीय ज्ञानोत्तर भक्ति मानणारे असले तरी त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं सुलभ अशी कृष्णभक्तीच भरलेली दिसून येते, हें दामोदर पंडितांचें 'वत्सहरण' नरेंद्राचें 'रुक्मिणी-स्वयंवर' महदंबेचे 'धवळे' (व तिचेंच रुक्मिणी स्वयंवर) इत्यादि महानुभावीय काव्यग्रंथांतील अनेक पंक्तींवरून दिसून येतें. श्रीकृष्णास पाहून, रुक्मिणीची 'कैसी संभ्रमित जाली। माडीवहनिया घालू पाहे झेप' असें वर्णन करून, कवयित्री महदंबा इने अपेक्षित भक्तीची पराकाष्ठा कोठपर्यंत जावयास पाहिजे हें फार हृदयस्पर्शी व मार्मिकपणे दाखविलें आहे. अगदी सुरवातीपासून सुद्धा भक्तीचें हें श्रेष्ठत्व ठिकठिकाणीं कसे वर्णिलेलें आहे, हें श्रुतींतील "नैषां तर्केण मतिरापनेया" (भाव पाहिजे; तर्क नको) व गीतेंतील 'भक्त्या त्वनन्यया शक्यं अहमेव विधोर्जुन' अ. ११ इत्यादि वचनांवरूनहि दिसून येतें.

ज्ञानोत्तर भक्ति!!

विद्वान संशोधकांचीं मतें पाहिली असतां नामदेव हे विदर्भस्थच संत कवि श्रेष्ठ ठरतात. अगदी लहान असल्यापासूनच जायापुत्र बापमाय। त्याचा न ये तो आठव ॥ अशी त्यांची स्थिति होऊन, त्यांना जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं आपला भक्तिविषयच दिसू लागला. व त्यांच्या भक्तीचें पर्यवसान खाली वर्णन केलेल्या स्थितींत झालें.

जब देखा–तब गावा
तउ जन धीरजु पावा••
जह झिलमिल झिलमिल
कारु दिसंता।
तहअनहत सबद् भजंता
रतन कमल कोठरी
चमकार बिजलु तही।

जह अनहत सूर उजारा
तह दीपक छलै छंछारा

[ज्या वेळेला परमेश्वराचें मी चिंतन–भजन करतों, त्या वेळेला परमेश्वर मला सर्व विश्वांत भरला आहे, असें वाटावयास लागतें; व परमेश्वराच्या रूपांत मी विरून गेलों आहे, असें वाटतें. मला त्या स्थितींत अत्यंत आनंद व धैर्य प्राप्त होतें व आघाताशिवाय एक प्रकारचा अत्यंत रमणीय नाद ऐकूं येतो व हृदयस्थ ज्योति प्रकट झाल्यासारखी भासते. माझ्या रत्नजडित हृदयावर विद्युत् प्रकाश चमकूं लागतो. भगवंताचे नाम हाच कोणी सूर्य माझ्या हृदयांत प्रकाशमान झाल्यानंतर बाह्य जगांतील दिवे मला क्षीण वाटूं लागतात. व परमेश्वर माझ्या हृदयांतच भरला आहे याचें सम्यज्ञान मला होतें.]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रत्नजडित हृदयावर विद्युत्प्रकाश चमकूं लागल्यानें दृश्य किती मनोहर असावें, तें ज्यांची कल्पनाशक्ति जितकी उत्तुंग असेल तितक्या प्रकर्षानें त्यास प्रतीत होईल, हें उघड आहे, किंवा त्यापेक्षाहि ज्यांनी असा अनुभव घेतलेला आहे, त्यालाच त्याची खरोखरीची कल्पना करणें शक्य आहे ! ही सर्व बाह्यी स्थितींत असलेल्या द्रष्टया कवीचीं लक्षणें आहेत. अशा वर्णन केलेल्या उत्कटोत्कट भक्तींतून निर्माण झालेल्या याच आनंदमय स्थितींमधून खरीं काव्यें कशीं निर्माण होतात, हें नामदेवादि संतांच्या काव्यावरून दृष्टोत्पत्तीस येतें. अशा भक्तींतूनच वर वर्णन केल्याप्रमाणे प्रतिभेचा प्रकाश फुलला; ईश्वराविषयी 'अपूर्व वस्तु-निष्ठा प्रज्ञा' उत्पन्न झाल्यामुळे त्याची प्रतिभा जागृत झाली व सर्वांना आकृष्ट करणारीं अशीं अमर काव्यें त्याच्या मुखांतून बाहेर पडलीं. केवळ भक्तीच्याच योगानें परमेश्वरस्वरूप झाल्यानंतर मग तेथे त्या विषयीचें सगळेंच ज्ञान आलें हें निराळे सांगावयास नको. ज्ञानोत्तर भक्ति संभवतहि नाही व ज्ञान झाल्यावर तिची आवश्यकताहि नाही हें मी माझ्या 'नवा प्रकाश' या काव्यांत दाखविलेलें आहे.

भक्तीचें श्रेष्ठत्व असें सार्वत्रिक गायिलेलें असले तरी कित्येक वचनांत ते पराकोटीला गेलेलें आहे, आणि तें खरेंहि आहे असें दिसून येईल. भक्तीपुढे योग–याग–तपें तर काय पण ज्ञान देखील रद्द आहे असें "नैष्कर्म्यमप्यच्युतभाव वर्जितं। न शोभते ज्ञानमलं निरंजनम्।" असें भागवतांतील व 'जळो तें जाणीव जळो ते शहाणीव। राहो माझा भाव विठ्ठल पायीं' इत्यादि, तुकारामाच्या वचनांवरून दिसून येतें.

विदर्भाच्या संतकवींतच काय पण सबंध भारतांतील संतकवींत नामदेव हे अग्रेसर होते; त्यामुळे त्यांच्या भक्तीच्या व इतरहि तत्वज्ञानाचा आणखी थोडासा उल्लेख करणें अपरिहार्य आहे.

> वेदपुरान सासत्र आनंता
> गीत कवित ना गाव उगो—

या गीतांत वेद, पुराणें, शास्त्रें, उजव्याडाव्या नाकपुड्यांतून श्वास घेणें व सोडणें, तीर्थयात्रा करीत फिरणें, इत्यादि मार्गांचा अवलंब मी कां करावा (तें करण्यांत कांहीच अर्थ नाही) असें नामदेव म्हणतात. त्यांत शास्त्रें व योगाची जराशी चेष्टाच केलेली दिसते. ते पुढे म्हणतात—वेद, पुराणें, शास्त्रें इत्यादि गीतांत कवित्व पुष्कळच आलेलें आहे. त्या गीताचें गायन करण्याची मला काय आवश्यकता आहे ? भाषेंतील कितीहि शब्द योजले तरी ज्याचें गुणगायन यथार्थ तऱ्हेनें होणार नाही, त्या परमेश्वराचें गायन मी माझ्या हृदयांतून निघणाऱ्या ध्वनिरूप वाद्यानें करीन, कोणा मनुष्याला त्रास देणार नाही व कोणाच्या स्तुति निंदेची पर्वा न करता, माझ्या अंतःकरणांत असलेल्या ६८ तीर्थांतच मी स्नान करीन व अशा रीतीनें मी आपला आत्मा परमेश्वराशीं एकरूप करीन हें 'बाद बिवादु काहू सिऊ न की जै। रसना राम रसाइनु पीजै' (वादविवादानें किंवा तर्कानें परमेश्वराचें स्वरूप दिसणार नाही, तें परमसत्तेचें स्वरूप केवळ भक्तीनेच दिसेल) इत्यादि वचनें 'रे कूपा' या काव्यांत मी जें ध्वनित केलें आहे त्याचा पाठपुरावा करतात.

मैं बऊरी

"मैं बऊरी मेरा राम भतारु" या दुसऱ्या एका गीतांत नामदेव स्वतःला एक वेडी स्त्री समजत आहे. प्रभुरूपी पतीकरिता ती नीटनेटका शृंगार करते. जनरीती याला हसते, ती तिची परवा करीत नाही ! शेवटीं याच गीतांत नामदेव म्हणतात को, 'हे लोकहो ! तुम्ही आता माझी स्तुति करा कारण ईश्वर मला आता भेटलेला आहे' ईश्वराला पति समजून भक्ति करणें हा प्रकार संतजीवनांत व वाङ्मयांत बराच आहे. ज्ञानेश्वरीच्या अध्याय बारा मध्ये 'अर्जुना तो भक्तु। तोची योगु तोची भक्तु। तो वल्लभ मी कांतु। ऐसे पढिये।' ही कल्पना आलेली आहे. रामकृष्ण परमहंस स्वतःला राधा समजून तीन दिवस अस्पर्श बसत (नुसतें काल्पनिक नव्हे) कृष्णाच्या चिंतनानें त्यांचा सर्व देह राधामय बनून जाई. या भक्तीस मधुर भाव साधना म्हणतात. "मी कित्येक दिवस राधाभावानें घालविले. मी स्त्रियांसारखा वेष करीं व स्त्रीवेषासाठी लागणारे सर्व जिन्नस व दागिने

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'प्रकट गुह्य बोले'

प्रा. श्री. भा. वर्णेकर

कोणत्याहि शास्त्राचे सिद्धांत त्या शास्त्राच्या क्षेत्राचें सूक्ष्म, सर्वंकष व सर्वांगीण निरीक्षण करून प्रतिपादन केलेले असतात. सामान्य बुद्धिवंताच्या दृष्टीला सृष्टींतील जीं रहस्यें किंवा गूढ प्रमेयें एकाएकीं दिसूं शकत नाहीत तीं शास्त्रज्ञाच्या क्रांतदर्शी दृष्टीला स्पष्ट दिसूं शकतात, हाच सामान्य मनुष्य व शास्त्रज्ञ यांच्यांतील फार मोठा फरक आहे.

"अहन्यहनि भूतानि गच्छंतीह यमालयम् ।
शेषाः स्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमतः परम् ॥"

या भगवान् व्यासांच्या उद्गारांत सामान्य मानव व दार्शनिक यांतील भेद स्पष्टपणें दिसून येतो. प्रतिदिन यमलोकाचे प्रवासी पाहूनहि सामान्य मनुष्याला जीवनाची नश्वरता दिसत नाही; उलट एक प्रेत दिसतांच समग्र संसाराची नश्वरता भगवान् बुद्धाच्या डोळ्यासमोर जणु साकार झाली. क्रांतदर्शी किंवा तत्त्वदर्शी लोकांना आकळलेले हे विविध शाश्वत सिद्धांत, सामान्य समाजाला समजावून सांगावेसें वाटणें स्वाभाविक आहे. पण ते जर सरळसोट सूत्रमय भाषेंत आपले सिद्धांत सांगूं लागले तर सर्वसाधारण बुद्धिवंताला त्यांचें नीट आकलन होत नाही, कारण त्याच्या

(पान १६ वरून)

मथुरेने मला आणून दिले. १९ ठिकाणचे भाव एकाच ठिकाणीं प्रकाशित झाल्यास त्यास महाभाव म्हणतात. जन्मभर साधना करून साधक एखाद्या भावाची सिद्धि मिळवितो; येथे मात्र एकाच धाराने, एके ठिकाणीं १९हि भाव पूर्णपणे प्रकाशित होतात. स्वाधिष्ठानचक्र असलेल्या भागाच्या सर्व रोमकूपांतून दर महिन्यास ठराविक वेळीं शोणित स्राव होत असे; आणि तो स्त्रियांप्रमाणे तीन दिवस चाले." अशा तऱ्हेचें वर्णन श्रीरामकृष्णचरित्र, पानें १३८ व १३९ यावर आलेलें आहे. त्याचप्रमाणे अमरावतीचे गुलाबराव महाराज बांगड्या घालून व काजळ कुंकू लावून याच पद्धतीने भक्ति करीत.

सार्वभौम सत्तेचें अंतिम स्वरूप पाहण्याकरता सर्व मार्गांपेक्षा भक्तिमार्गच श्रेष्ठ, हें संत नामदेवांनी आपल्या जीवनाने, काव्याने व तत्वज्ञानाने दाखवून दिलें आहे. त्याचप्रमाणे योगमार्गाचें वर्णन करतांना ज्ञानेश्वरांनी देखील शेवटीं भक्तीचाच आश्रय घेतला आहे. 'म्हणोनी योगमार्गाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तया दुःखाचिया शेलवाटा । भाग आला ॥ १२ । ६९; म्हणोनी येर ते पार्था । नेणतीच हे व्यथा । जे का भक्तिपंथा ओटंगले ॥१२ । ७५॥ नामयाची दासी जनी इने तर शिक्षणाचे कांही संस्कार नसतांच, जें सर्वोत्कृष्ट कवित्व लिहून ठेवलें त्यास बहुतेक तोड नाही ! 'नाममहिमा जाणे । ध्यातां ध्यातां विठ्ठल होणें' या तिच्या ग्वाहींत, भक्तीचें पराकोटीचें महत्त्व वर्णिलें एवढेंच नसून, भक्तीनेच ज्ञान होतें हेंहि तत्त्व अंतर्भूत झालें आहे. मात्र भक्तिमार्ग समजतात तितका सोपा नाही ! ज्ञानकर्माइतकाच तो खडतर आहे ! भक्ति हा सहज धर्म असल्यामुळें, कृत्रिम पद्धतीनें व बळजबरीने तो निर्माण होणें केवळ अशक्यप्राय आहे ! भक्ति साधीसुधी नको; विश्वसत्तेचें संपूर्ण स्वरूपदर्शन होऊन, त्यांत विलीन होण्याकरता, पतंगाच्या दीपशिखेवर जाळून घेण्याच्या अग्निदिव्यापेक्षाहि दिव्यतर भक्तीची अपेक्षा आहे !!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रज्ञाचक्षूपुढे ते सिद्धांत मूर्तरूपानें उभे राहात नाहीत. अशा वेळीं आपल्या प्रतिपाद्य सिद्धांताला साकार करील असा चपखल दृष्टांत देण्यांत शास्त्रज्ञाची खरी बुद्धिमत्ता व्यक्त होते. त्याच्या क्रांतदर्शितेची खरी कसोटी त्याच्या दृष्टांतांवरून लागते.

आध्यात्मिक शास्त्राचे सारेच सिद्धांत केवळ बुद्धिगम्य असल्यामुळे त्यांचा मूर्तग्राही पद्धतीने आविष्कार करणें अत्यंत आवश्यक असतें. आध्यात्मिक ग्रन्थामध्ये ज्ञानेश्वरीचें असाधारण महत्त्व तिच्यांत कोंदाकोंदी भरलेल्या दृष्टान्तामुळे आहे. सिद्धांत कितीहि सरळ व सोपा असला तरी एकावर एक मात करणारे विविध दृष्टांत दिल्यावाचून ज्ञानेश्वरमहाराज पुढे सरकतच नाहीत. भगवद्गीतेसारख्या उपनिषदाला ज्ञानेश्वरींत संपूर्णपणे काव्यरूपता येण्याचें मुख्य कारण ज्ञानेश्वरांचें दृष्टांतसामर्थ्य. ज्ञानेश्वरांनी काव्यरचना करण्याच्या हेतूनें गीतेचें भाष्य लिहिण्याचा खटाटोप केला नाही. भगवद्गीतेसारख्या जीवनोपयुक्त ग्रंथाचा 'भावार्थ' जनतेला कळावा हाच त्यांचा एकमात्र उद्देश. पण तो सफल करण्याच्या प्रयत्नांत त्यांनी जी हृदयंगम दृष्टांताची रेलचेल करून सोडली, त्यामुळे ज्ञानेश्वरी वाचणाऱ्या साधारण वाचकाला ज्ञानेश्वरीच्या पहिल्या पारायणांत तत्त्वज्ञानानंदाचा अनुभव न येतां काव्यानंदाचा अनुभव प्रामुख्याने येतो. पुढे ४–५ पारायणें केल्यावर ते कोंदाकोंदी भरलेले उपमा–दृष्टांत पचनीं पडले म्हणजे मग ज्ञानेश्वरीचें तात्त्विक स्वरूप उद्भासित होऊं लागतें. (ज्ञानेश्वरीचें हें वैशिष्ट्य विशद करावयासाठीच एखादा चपखल दृष्टांत देण्याची आवश्यकता; पण तो मी देत नाही. वाचकांनी माझ्या म्हणण्याचा आशय समजून घेऊन स्वतःच एखादा दृष्टांत शोधून काढावा. किंबहुना माझ्या म्हणण्याचा आशय त्यांच्या लक्षांत आला असेल तर तो इतरास सांगण्याचा प्रयत्न करतांच त्यांच्या तोंडून एखादा सुंदर दृष्टान्त बाहेर पडेल.)

पण सिद्धांत जितका अलौकिक तितका त्याला समर्पक असा लौकिक दृष्टान्त सुचणें कठिण असतें. शास्त्रीय सिद्धांताला जोडूनच दृष्टांत दिलेला नसेल तर तो शास्त्रीय सिद्धांत वाचकाच्या मनाची पकडच घेऊं शकत नाही. पाणिनीची सूत्रमय अष्टाध्यायी कंठस्थ करून व्याकरणशास्त्राचे सिद्धांत कंठगत झाले तरी विशद होत नाहीत. एकेका अल्पाक्षररमणीय सूत्रामागे संपूर्ण संस्कृत भाषेच्या शब्दार्णवाचें मंथन करणारी महान् तपस्या उभी आहे. त्यामुळे भाषेतील उदाहरण किंवा दृष्टांत दिल्यावाचून ते सूत्रबद्ध सिद्धांत आकारास येतच नाहीत.

वेदांतासारख्या वेदमूलक शास्त्रामध्ये समर्पक दृष्टांताची नितांत आवश्यता असते हें ओळखून, वेदांतशास्त्रकारांनी वेदोदधीचें आलोडन करून प्राप्त केलेले दुर्बोध सिद्धांत सुयोग्य दृष्टांतांनी प्रकाशित करून ठेवलेले आहेत; ते दृष्टांत जर नीट लक्षांत आले तर वेदांत हा इतर लौकिक विषयासारखाच सरळ वाटूं लागतो. वेदांतशास्त्र शिकण्याच्या दोन पद्धति आहेत. (१) ज्या श्रुतिवचनांच्या आधारें वेदांताचे शास्त्रीय सिद्धांत मांडण्यांत आले त्यांचा अभ्यास करणें व (२) श्रुतिवचनमूलक सिद्धांत ज्या लौकिक दृष्टांतांच्या आधारें विशद केले त्या दृष्टांतांचा अभ्यास करणें. पहिली पद्धति शास्त्रीय व दुसरी लौकिक आहे. आज वेदाध्ययन बंद पडल्यामुळे लौकिक पद्धतीनेंच वेदान्त शिकविणें आवश्यक आहे. संतांनी याच लौकिक पद्धतीने 'ब्रह्मज्ञानाचा सुकाळ' महाराष्ट्रांत केला आहे. उपनिषद्ग्रंथांतून याच लौकिक किंवा बालबोध पद्धतीचा अवलंब केलेला आढळून येईल. उदा० छांदोग्य उपनिषदांतील 'तत्त्वमसि श्वेतकेतो' हें प्रकरण पाहा. या पद्धतीचा अवलंब ज्ञानेश्वरांनी केल्यामुळे ज्ञानेश्वरांच्या संबंधांत "प्रकट गुह्य बोले" हें विधान करण्यांत आलें आहे. शास्त्रकारांनी दिलेले सर्व दृष्टांत सर्वसामान्य मनुष्याच्या नित्य अनुभवांतले आहेत, पण "नित्याच्या अवलोकनें जन पहा होती कसे आंधळे" ही वस्तुस्थिति असल्यानें सर्वसामान्य माणसाला व्यावहारिक जीवन जगत असतांना वेदान्ताचें प्रकट राजगुह्य अनुभवास येत नाही. म्हणुन वेदांतशास्त्रांत लौकिक दृष्टांतांना अत्यंत महत्त्व आहे. प्रस्तुत लेखांत वेदांतांतील कांही प्रमेयें विशद करणाऱ्या प्राचीन शास्त्रग्रंथांतील कांही लौकिक दृष्टांतांची वाचकांना ओळख करून द्यावयाची आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुरुशिष्य संबंध

वेदांत हें गुरुमुखी शास्त्र आहे. त्यामुळे वेदांत-जिज्ञासु हा कितीहि बुद्धिमान पंडित असला तरी त्याला गुरूची आवश्यकता आहेच. वेदांतशास्त्राचा 'अधिकारी' सामान्य मनुष्य असूंच शकत नाही. "विधिवदधीतवेदवेदाङ्गत्वेन आपाततः अधिगताखिल-वेदार्थः, अस्मिन् जन्मनि जन्मांतरे वा काम्यनिषिद्धवर्जन-पुरस्सरं नित्यनैमित्तिकप्रायश्चित्तोपासनानुष्ठानेन निर्गतनिखिलकल्मषतया (नितान्तनिर्मलस्वान्तः साधनचतुष्टयसम्पन्नः । नित्यानित्यवस्तुविवेकी, इहामुत्रार्थफलभोगविरागी, शमदमोपरतितितिक्षा-समाधानश्रद्धासम्पन्नः मुमुक्षुश्च) प्रमाता । " अशा प्रकारचा श्रेष्ठ पुरुष वेदान्ताचा 'अधिकारी' मानण्यांत आला आहे. कारण वेदान्त हें पोपटपंचीचें भारुड नसून परमोन्नत मानवी जीवनाचें दर्शन आहे. नव्हे, प्रत्यक्ष मुक्तीचें साधन आहे, अशी भारतीयांची धारणा आहे. म्हणून अशा "अधिकारी" पुरुषानें सुद्धा वेदान्त ज्ञानाच्या प्राप्तीसाठी गुरूला शरण गेलेंच पाहिजे. पण शरण कसें जावें ?

" तद्विज्ञानाय स गुरुमेवाभिगच्छेत् ।
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं " ॥

असें वेदांत सांगितलें आहे म्हणून हातांत समिधा घेऊन जावें असें नव्हे, तर आंतरिक तळमळीने शरण जावें असें शास्त्रकारांचें त्या वेदवचनावर भाष्य आहे. ही अंतरींची तळमळ किती उत्कट असावी या संबंधांत वेदान्तशास्त्रांत अतियोग्य दृष्टान्त दिला आहे. तो म्हणजे,

'दीप्तशिराः जलराशिमिव'

सूर्याच्या प्रखरतर किरणांनी मस्तक तापून गेलें असतां, मनुष्य आपला अंगदाह शमविण्याकरिता ज्या व्याकुळतेनें एखाद्या सरोवराकडे धावून जातो तसें या 'अधिकारी' पुरुषाने संसाराच्या त्रिविध तापांचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावर तगमगत्या अन्तःकरणाने गुरूला शरण जावें. "मुमुक्षूने ब्रह्मनिष्ठ श्रोत्रियाला तत्त्वज्ञान प्राप्तीसाठी शरण जावें" या वेदान्तील आशय "दीप्तशिराः जलराशिमिव" या दृष्टान्ताने किती उत्कटपणे उकलून दाखविला गेला.

अध्यारोप

(स्वयंप्रकाश व अनन्त अशा) ब्रह्मरूप 'वस्तु' च्या ठिकाणीं (अज्ञान व तज्जन्य चराचर) जगत्‌रूपी 'अवस्तु'चा भ्रम मानवाला होत असतो हा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. या ब्रह्मावरील जगताच्या भ्रमाला वेदान्ताच्या शास्त्रीय परिभाषेंत "अध्यारोप" म्हणतात. " यदन्यदन्यत्र विभाव्यते भ्रमाद् । 'अध्यास' इत्याहुरमुं विपश्चितः ॥ " अशी अध्यासाची व्याख्या सांगितलेली आहे पण ही शास्त्रीय कल्पना,

"असर्पभूतायां रज्जौ सर्पारोपवत्"

या प्रसिद्ध दृष्टान्ताने जशी स्पष्ट स्वरूपांत उभी राहते तशी दहा वाक्यांनी देखील उभी राहात नाही. अध्यासाची कल्पना शेकडों प्रकारच्या अवान्तर दृष्टान्तांनी विशद करतां येणें शक्य आहे; कारण समान गुण-दर्शनामुळे एखाद्या वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा भ्रम होणें हा अनुभव निरनिराळ्या प्रसंगीं प्रत्येकाला केव्हाना केव्हा तरी आलेला असतो. पण प्रत्येकाचा अनुभव प्रस्तुत दृष्टांतांतील अनुभवासारखा सार्वलौकिक नसतो. म्हणून 'रज्जूसर्प' दृष्टान्ताला विशेष महत्त्व आहे. अगदी लहान मुलालासुद्धा हा दृष्टान्त चटदिशीं लक्षांत येण्यासारखा नाही काय ? रज्जूसर्पाचा दृष्टान्त किंवा शुक्तिकारजताचा दृष्टान्त हेंच वेदान्ताच्या अध्यास-वादाचें अतिसुबोध असें लौकिक स्पष्टीकरण आहे.

अनिर्वचनीय अज्ञान

वेदान्तशास्त्रांत सच्चिदानन्दस्वरूप ब्रह्माला 'वस्तु' व अज्ञान आणि अज्ञानजन्य संपूर्ण जगताला 'अवस्तु' म्हणतात. रज्जुसर्पाच्या दृष्टान्तांत रज्जु 'वस्तु' आहे व त्यावर अज्ञानानें भासलेला सर्प हा 'अवस्तु' आहे. अज्ञान हें 'सत्' नाही, कारण वास्तव ज्ञान झाल्यावर त्याचा निरास होतो. त्याच-प्रमाणे अज्ञान हें 'असत्' देखील नाही कारण रज्जूवर सर्पाचा भास अज्ञानामुळेच झाला. म्हणजेच तें संपूर्ण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृश्य जगताचें एकप्रकारें कारण आहे. अशा प्रकारें अज्ञान हें सत् व असत् दोन्ही प्रकारचें नसल्याने त्याचें ज्ञान होणें अशक्य आहे. म्हणूनच तें अनिर्वचनीय आहे. अज्ञानाचें हें अनिर्वचनीयत्व वेदांत-सिद्धांत-मुक्तावली-काराने एक सुन्दर व समर्पक दृष्टांत देऊन विशद केलें आहे. मुक्तावलीकार म्हणतात—

"अज्ञानं ज्ञातुमिच्छेद् यो मानेनात्यन्तमूढधीः ।
स तु नूनं तमः पश्येद्दीपेनोत्तमतेजसा ॥"

दिव्याच्या प्रकाशांत अंधार पाहणें हें जितकें अशक्य आहे तितकेंच प्रत्यक्ष प्रमाणाच्या साहाय्याने अज्ञान जाणणें अशक्य आहे. (या अज्ञानालाच श्री शंकराचार्य माया किंवा अविद्या म्हणतात.)

व्यष्टि आणि समष्टि

वेदांमध्ये मायेचा एकवचनी व बहुवचनी अशा दोन प्रकारच्या शब्दांनी निर्देश केला आहे. (उदा० "अजामेकां लोहितशुक्लकृष्णाम् ।" व "इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयते ।") वेदवचन प्रमाण मानणाऱ्या वेदांत-शास्त्रज्ञांनी या परस्पर विरोधी वचनांचा समन्वय व्यष्टि-समष्टि न्यायाने लावला आहे. ही व्यष्टि-समष्टि कल्पना,

'वृक्ष आणि वन'

यांच्या दृष्टांताने सुबोध केलेली आहे.

"यथा वृक्षाणां समष्टच्यभिप्रायेण 'वनम्' इति एकत्व व्यपदेशो भवति । यथा च वनस्य व्यष्टच्यभिप्रायेण 'वृक्षाः' इति अनेकत्वव्यपदेशो भवति" ।

या वृक्ष-वन दृष्टांतावरून वेदाने अज्ञानाचा निर्देश एकवचनी व बहुवचनी अशा विरुद्ध शब्दांनी का केला तें सहज स्पष्ट होतें. एकाच वृक्षाचा उल्लेख वृक्षाभिप्रायाने करावयाचा असल्यास 'वृक्षाः' या बहु-वचनी शब्दाने करतां येतो, किंवा असंख्य वृक्षांचा उल्लेख वनाभिप्रायाने 'वनम्' या एकवचनी शब्दाने देखील करतां येतो. त्याप्रमाणे नानारूपांनी प्रतिभासित होणाऱ्या जीवगत अज्ञानांचा समष्टिरूपाने "अजाम् एकां लोहित-शुक्लकृष्णाम्" या वेदवचनाने एकवचनी निर्देश केला आहे व "इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते" या वेदवचनांत व्यष्टिरूपाने त्याच अज्ञानाचा बहुवचनी निर्देश केला आहे. अज्ञानाचें एकरूपत्व व अनेकरूपत्व या 'वृक्ष-वन' दृष्टांतामुळे स्पष्ट होतें.

विभिन्नतेंत अभिन्नता

वेदान्त शास्त्राने अज्ञानाच्छादित चैतन्य (ईश्वर-प्राज्ञ रूप) व मूळ विशुद्ध चैतन्य (किंवा तुरीय चैतन्य) यामध्ये विभिन्नता असतांहि अभिन्नताच प्रतिपादन केलेली आहे. विभिन्नतेंतील अभिन्नतेची कल्पना विशद करण्यासाठीं,

'तप्तायःपिण्डवत्'

हा अत्यंत समर्पक व सर्वांच्या परिचयाचा दृष्टान्त दिला आहे. अग्निकुण्डांत टाकलेला लोखंडाचा गोळा अग्निप्रमाणे लाल झाला असतांना त्याच्या अंगच्या भारादि लोखंडाच्या गुणधर्मामुळे आपण त्याला लोखंडाचा गोळा म्हणून जाणत असलों तरी त्याच्या ठिकाणीं अग्नीचे दाहकत्वादि गुणधर्म प्रत्यक्ष दिसत असल्याने त्याला अग्नीचा गोळाच मानतों. तप्तायःपिण्डाच्या प्रस्तुत दृष्टान्ताने विभिन्नतेंतील अभिन्नता उत्कृष्ट प्रकारें विशद होते. उपाधिभेदामुळे ईश्वर-प्राज्ञ व तुरीय चैतन्य यांमध्ये विभिन्नता भासत असली तरी मूळ स्वरूपांत एकताच आहे, हा वेदान्ताचा महान् सिद्धान्त आहे.

अज्ञानाच्या दोन शक्ति

वेदान्त शास्त्रानुसार अज्ञान हें ज्ञानविरोधी, त्रिगुणात्मक, भावरूप, अनिर्वचनीय पण स्वानुभवगम्य असून त्याच्या ठिकाणीं दोन प्रकारची शक्ति आहे. पहिली **'आवरण शक्ति'** या शक्तीचें स्वरूप मेघाच्छा-दित सूर्याचा दृष्टान्त देऊन स्पष्ट केलें आहे. ज्याप्रमाणे लहानसा मेघ अनेक योजन विस्तीर्ण सूर्याला आच्छा-दित करतो त्याप्रमाणे अल्प अज्ञान आवरण शक्तीच्या बळावर आत्मस्वरूपाला आच्छादित करतें. वस्तुतः मेघ सूर्याला आच्छादित करीत नसून पाहणाऱ्याच्या दृष्टीला आच्छादित करतो. हीच मेघाची आवरण शक्ति. त्याप्रमाणे अल्प अज्ञान सर्वव्यापी परब्रह्माला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

आच्छादित करीत नाही तर आपल्या आवरण शक्तीने मानवाच्या बुद्धीला आच्छादित करतें व म्हणून मेघाचें आवरण आलें असतां दृष्टीला जसा सूर्य दिसत नाही त्याप्रमाणे अज्ञानाच्या आवरणशक्तीमुळे बुद्धीला परब्रह्माचें आकलन होत नाही.

अज्ञानाच्या दुसऱ्या शक्तीचें नांव 'विक्षेपशक्ति'. हिचें स्वरूप पूर्वपरिचित रज्जुसर्पाच्या दृष्टान्ताने विशद करतात. रज्जूच्या ठिकाणीं उद्‌भासित झालेला सर्प अज्ञानाच्या विक्षेप शक्तीमुळे उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे ब्रह्मविषयक अज्ञान स्वतःच्या विक्षेप शक्तीच्या बळावर ब्रह्माच्या ठिकाणीं सूक्ष्म शरीरापासून ब्रह्माण्डापर्यंत सारा प्रपंच उद्‌भासित करतें. हा वेदान्ताचा अत्यंत महत्त्वाचा सिद्धान्त आहे.

परब्रह्म हेंच जगत्कारण

परब्रह्म हेंच जगत्कारण आहे, असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. पण कारण हें दोन प्रकारचें असतें (१) उपादान कारण व (२) निमित्त कारण. माती हें घटाचें उपादान कारण व कुंभाराचें चाक, दांडा इत्यादि निमित्त कारण. ब्रह्म हें उपादान कारण असेल तर "**कारणगुणाः कार्यगुणान् आरभन्ते**" या न्यायाने ब्रह्माचें नित्यत्व चेतनत्व इत्यादि गुण प्रपंचाच्या ठिकाणीं दिसावयास हवेत (जसे मातीचे गुण घटाच्या ठिकाणीं असतात). पण प्रपंच हा अनित्य व जड आहे म्हणून ब्रह्म प्रपंचाचें उपादान कारण मानूं नये.

त्याचप्रमाणे ब्रह्म हें प्रपंचाचें "निमित्त कारण" मानूं नये, कारण "**तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्**" (तें ब्रह्म, सृष्टि निर्माण करून त्यामध्येच प्रविष्ट झालें) या तैत्तिरीयोपनिषदांतील वचनावरून ब्रह्म स्वतःच्या कार्यामध्ये व्याप्त झालें असें कळतें. 'निमित्त कारण' (चक्र, दण्ड इत्यादि) कार्यामध्ये व्याप्त झाल्याचें आपण कधी पाहिलें नाही. यावरून ब्रह्म हें जगताचें 'निमित्त कारण' मानणेंहि अयोग्य आहे, असा वेदान्तांच्या विरोधकांचा युक्तिवाद आहे. या विचित्र प्रकारच्या अडचणींतून वेदान्ताने ब्रह्माचें उभयरूप जगत्कारणत्व एका अतिपरिचित सुंदर दृष्टान्ताच्या आधारें विशद केलें आहे. तो दृष्टान्त म्हणजे

लूता (कोळी) व त्याचें तन्तुकार्य

हा होय. ज्याप्रमाणे लूता म्हणजे कोळी हा प्राणी त्याच्या जाळयाचें 'निमित्त कारण' व 'उपादान कारण' असें उभयरूप कारण असतें त्याप्रमाणे ब्रह्म हें प्रपंचाचें उभयरूप कारण आहे. कोळयाच्या ठिकाणची चैतन्य शक्ति हें त्याच्या जाळयाचें निमित्त कारण असतें व त्याचें शरीर हें त्या जाळयाचें उपादान कारण असतें. कोळयाचें केवळ शरीर किंवा केवळ चैतन्य तन्तुजालरूपी कार्य करूं शकत नाही. त्याचप्रमाणे अज्ञानाच्छादित ब्रह्म चैतन्यप्रधानतेच्या दृष्टीने प्रपंचाचें 'निमित्त कारण' व अज्ञानप्रधानतेच्या दृष्टीने 'उपादान कारण' आहे. ब्रह्माचें उभयकारणरूपत्व विशद करण्यास कोळयाच्या दृष्टान्तासारखा उत्कृष्ट व सर्वपरिचित असा दुसरा दृष्टान्त देतां येणार नाही.

कारणनाश झाला की कार्यनाश अटळ

वेदान्त शास्त्राच्या मतें 'अविकारी' पुरुषाला गुरुमुखांतून '**तत्त्वमसि**' या महावाक्याचा 'अध्यारोपापवाद' न्यायाने योग्य उपदेश झाला की त्याच्या हृदयांत 'अहं ब्रह्मास्मि'—मी ब्रह्म आहें अशा प्रकारची चित्तवृत्ति उदय पावते. या उदात्त चित्तवृत्तीमुळे त्याच्या ठिकाणचें ब्रह्मविषयक अज्ञान नष्ट होतें; पण हें अज्ञान नष्ट झालें तरी, अज्ञानाचें कार्य असलेला समस्त जड प्रपंच त्याला प्रत्यक्ष अनुभवास येईल किंवा नाही असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचें उत्तर "**कारणे नष्टे कार्यमपि नश्यति**" या सिद्धान्तवाक्याने देण्यांत येतें. पण या सिद्धान्ताचें स्पष्टीकरण योग्य प्रकारें करण्यासाठी दिलेला दृष्टान्त फारच उद्‌बोधक आहे. तो म्हणजे,

"तन्तुदाहे पटदाहः"

हा होय. तन्तु हें कारण व वस्त्र हें त्याचें कार्य. त्याप्रमाणे ब्रह्मविषयक अज्ञान हें कारण व प्रपञ्च हें त्याचें कार्य आहे. तन्तु जाळल्यानंतर वस्त्र स्वतंत्रपणें जाळावें लागत नाही. त्याप्रमाणे 'तत्त्वमसि' या महावाक्याच्या उपदेशाने 'अहं ब्रह्मास्मि' ही चित्तवृत्ति उदित होऊन ब्रह्मविषयक अज्ञान नष्ट झालें की

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अज्ञानाचें कार्य असलेला प्रपंच देखील लय पावेल हें उघड होतें.

अद्वैतसिद्धि

'तत्त्वमसि' या महावाक्याच्या आकलनामुळे उत्पन्न होणारी 'अहं ब्रह्मास्मि' प्रकारची अखण्डाकाराकारित चित्तवृत्ति, अज्ञान व तज्जन्य प्रपञ्चाचा लय करते हा वेदांताचा सिद्धांत आहे. त्यांतून असा प्रश्न उत्पन्न होतो की, प्रपंचाचा लय झाला तरी अज्ञान व प्रपञ्च यांचा लय करणारी 'अहं ब्रह्मास्मि' ही चित्तवृत्ति अवशिष्ट राहात असावी. पण वेदांतमतें ही चित्तवृत्ति सुद्धा अज्ञानाचेंच कार्य असल्यामुळे 'तन्तुदाहे पटदाहः' या दृष्टान्तानुसार अज्ञान नष्ट होतांच लय पावते. त्यावर पुढचा प्रश्न असा की, अज्ञान, प्रपंच व चित्तवृत्ति या सर्वांचा लय झाल्यावर, चित्तवृत्तीमध्यें प्रतिबिम्बित झालेला चैतन्याभ्यास पृथक् राहात असावा व तो जर पृथक् राहात असेल तर वेदांताचा अद्वैत सिद्धांत असिद्ध ठरतो. या आक्षेपाचें खण्डन अद्वैतवादी वेदांतशास्त्रज्ञांनी एक अत्यंत समर्पक व सर्वांच्या अनुभवास येणारा दृष्टांत देऊन केलें. तो दृष्टांत म्हणजें,

दर्पणाभावे मुखप्रतिबिंबस्य मुखमात्रत्वम्

हा होय. आरशामध्यें पडलेलें प्रतिबिंब आरसा नाहीसा केला असतां मूळ मुखस्वरूपांत अवशिष्ट राहतें. किंबहुना तें प्रतिबिंब मुखच होतें, त्याप्रमाणे अहं ब्रह्माऽस्मि–या चित्तवृत्तींत पडलेलें चैतन्याचें प्रतिबिंब, ती चित्तवृत्ति (तन्तुदाहे पटदाहः या न्यायानें) लय पावली असतां मूळ स्वरूपांतच अवशिष्ट राहतें किंवा चैतन्यरूपच होतें हें उघड आहे. हाच सिद्धांत,

दीपप्रभा आदित्यप्रभाऽवभासनासमर्था सती तया अभिभूयते

या दुसऱ्या एका दृष्टान्ताने स्पष्ट केला आहे. दीपप्रभा व सूर्यप्रभा या स्वतंत्र असल्या तरी दीपप्रभेच्या मंदते-मुळे ती सूर्यप्रभेंत विलीन होऊन जाते; त्याप्रमाणे 'अहं ब्रह्माऽस्मि' या चित्तवृत्तींत प्रतिबिम्बित झालेलें मन्दप्रभ चैतन्य परब्रह्माच्या स्वरूपांत विलीन होतें.

चित्तवृत्तींचें कार्य व विलय

'तत्त्वमसि' या महावाक्याचा उपदेश 'अधिकारी' शिष्याला गुरुमुखांतून प्राप्त झाल्यानंतर त्याच्या चित्तवृत्तींत 'अहं ब्रह्मास्मि' हा भाव जागृत होतो किंवा 'अहं ब्रह्माऽस्मि' मी ब्रह्मच आहें अशा स्वरूपाची चित्तवृत्ति बनते. ही 'अहं ब्रह्माऽस्मि' चित्तवृत्ति उत्पन्न होतांच आपलें कार्य एक क्षणांत करून लयास जाते. तिचें कार्य म्हणजे जीवचैतन्याच्या ठिकाणचें अज्ञानाचें आवरण नष्ट करणें हें होय. ज्या क्षणीं हें अज्ञान लयास जातें त्याच क्षणीं अज्ञानाचें कार्य असलेली चित्तवृत्ति सुद्धा चैतन्याच्या ठिकाणीं लयास जाते. या प्रक्रियेस दिलेला

मलिनं जलं निर्मलीकृत्य
कतकचूर्णं तस्मिन्नेव जले विलीयते

हा दृष्टांत फारच उद्बोधक आहे. तुरटीचें चूर्ण पाण्यांतला गढूळपणा नष्ट करून त्या पाण्यांतच स्वतःचें कार्य संपतांच विलीन होतें. त्याप्रमाणें 'अहं ब्रह्मास्मि' ही चित्तवृत्ति चैतन्यविषयक अज्ञान क्षणांत नष्ट करून चैतन्याच्या ठिकाणीं विलीन होते. प्रस्तुत सिद्धांत अनिर्वचनीय व सामान्य मनुष्याला अगोचर असला तरी या कतक–चूर्णाच्या दृष्टान्तानें (कतक-चूर्णानें गढूळ पाणी स्वच्छ व्हावें त्याप्रमाणे) स्वच्छ झाला आहे.

विरुद्ध श्रुतिवचनांचा समन्वय

वेदोपनिषदांमध्यें ब्रह्मज्ञानप्राप्तीसंबंधी, "यन्मनसा न मनुते" व "मनसैवानुद्रष्टव्यम्" (जें मनानें कळत नाही) व (जें मनानेंच पाहावें) यासारखीं अनेक परस्परविरोधी वचनें आढळतात. (गीतेंत "बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव" आणि "अनाशिनोऽप्रमेयस्य" यासारखीं परस्परविरोधी वचनें अनेक आहेत.) या परस्परविरोधी श्रुतिवचनांचा समन्वय वृत्तिव्याप्यत्वाचा अंगीकार व फलव्याप्यत्वाचा प्रतिषेध करून शास्त्रकारांनी लावला आहे. पण पंचदशीकारांनी

"चक्षुर्दीपावपेक्षेते घटादेर्दर्शने यथा ।
न दीपदर्शने किंतु चक्षुरेकमपेक्ष्यते ॥"

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या लौकिक दृष्टांताने ही विरोधी वचनांची समस्या दूर केली आहे. अंधारांतला घट पाहण्यासाठी डोळा व दिवा या दोघांची आवश्यकता असते, पण (जळता) दिवा पाहण्यासाठी केवळ डोळा असला की पुरे ! त्याप्रमाणे चैतन्यविषयक अज्ञानाचा अंधार नाहीसा करून चैतन्याचा साक्षात्कार होण्यासाठी 'अहंब्रह्माऽस्मि' ही चित्तवृत्ति व त्या चित्तवृत्तींत प्रतिबिम्बित झालेला चिदाभास या दोघांची आवश्यकता असते. म्हणून अज्ञानाचा अंधार नाहीसा करण्याच्या अभिप्रायाने 'मनसैवेदमाप्तव्यम्' किंवा 'मनसैवानुद्रष्टव्यम्' हें श्रुतिवचन योग्य आहे व त्याच्या विरोधी भासणारी 'यन्मनसा न मनुते ।' "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।" यासारखीं वचनें प्रकाशणारा दिवा पाहण्यास दुसऱ्या दिव्याची आवश्यकता नसते. तो स्वतःच प्रकाशमान असल्याने केवळ डोळा असला की पुरे ! घटासारख्या जड वस्तूचें ज्ञान व परब्रह्मासारख्या सच्चिदानन्दरूप वस्तूचें ज्ञान यांमधील भेद या दीप-घटज्ञानाच्या दृष्टांताने विशद केला आहे.

सविकल्पक व निर्विकल्पक समाधि

ज्ञेय पदार्थाच्या ठिकाणीं चित्ताची जी निश्चल अवस्था होते त्या चित्तावस्थेला वेदान्त शास्त्रांत 'समाधि' म्हणतात. चित्ताच्या या समाधिस्थ अवस्थेचे दोन भेद आहेत. (१) सविकल्पक व (२) निर्विकल्पक. सविकल्पक समाधीमध्ये ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय या त्रिपुटीचें भेदज्ञान असूनहि 'अहं ब्रह्माऽस्मि' या प्रकारची अखाण्डाकाराकारित चित्तवृत्ति राहते. भेदज्ञान असूनहि अद्वैताचें भान होणें ही कल्पना फार गूढ वाटते; पण ती

मृन्मयगजादिभाने मृद्भानवत्

या लौकिक दृष्टान्ताने अगदी सुबोध करण्यांत आली आहे. मातीचे हत्ती, घोडे, उंट इत्यादि विभिन्न पदार्थांचें ज्ञान होत असतांहि नामरूपादि भेद मिथ्या असून मातीच सत्य आहे हें ज्ञान होतें. त्याप्रमाणे सविकल्पक समाधीच्या अवस्थेंत ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीच्या भिन्नतेचें भान असलें तरी सर्वत्र अद्वैत ब्रह्मच व्याप्त आहे असा अनुभव येत असतो. विभिन्नतेंतील अभिन्नता हा केवळ कल्पनेचा विलास नसून अनुभवाचा विषय आहे. असा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. निर्विकल्पक समाधि अवस्थेची कल्पना,

"जलाकाराकारितलवणस्य जलमात्रावभासः"

या दृष्टान्ताने विशद केली आहे. मीठ पाण्यांत मिसळल्यावर मीठ आणि पाणी यांचें पृथक् ज्ञान होत नाही. पाण्यांत मीठ असूनहि केवळ पाणीच भासतें. त्याप्रमाणे निर्विकल्प समाधीची अवस्था चित्तवृत्तीला प्राप्त झाली म्हणजे ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय इत्यादि भेदभाव लुप्त होतात. चित्तवृत्ति पाण्यांत विरघळलेल्या मिठाप्रमाणे परब्रह्माशीं एकरूप होते. याच 'जल-लवण' दृष्टान्ताच्या आधारें सुषुप्ति अवस्था व निर्विकल्पक समाधि अवस्था यांतील भेद शास्त्रज्ञांनी विशद केला आहे. तो असा—सुषुप्ति व निर्विकल्पक समाधि या दोन्ही अवस्थेंत चित्तवृत्तीचें भान नसतें ही गोष्ट खरी. पण तेवढ्यामुळे या दोन्ही अवस्था तुल्यरूप होत नाहीत. मीठ मिसळलेलें पाणी व नुसतें पाणी दोन्ही समान दिसत असलें तरी दोघांमध्ये भेद असतो. या दोन पाण्यांमध्ये जितका भेद आहे तितकाच निर्विकल्प समाधि व सुषुप्ति या दोन अवस्थांमध्ये आहे. निर्विकल्पक समाधि अवस्थेंत चित्तवृत्ति भासत नसली तरी ती नसते असें नाही. उलट सुषुप्ति अवस्थेंत चित्तवृत्ति भासत नाही कारण ती राहतच नाही.

निर्विकल्पक समाधींत चित्ताची अवस्था

निर्विकल्पक समाधि हें वेदान्ताचें चरम प्राप्तव्य ! पण त्याच्या मार्गांत 'अधिकारी' साधकाला लय, विक्षेप, कषाय व रसास्वाद हीं चार विघ्नें आडवीं येतात. त्यावर मात करून साधक पुढे गेला असतां त्याला निर्विकल्पक समाधीची अवस्था प्राप्त होते. या अवस्थेंत चित्त अचल होऊन अखण्ड चैतन्याचा अनुभव येतो. चित्ताच्या या अविचल अवस्थेची अगोचर कल्पना स्पष्ट होण्यासाठी दिलेला

"यथा दीपो निवातस्थो नेङ्गते"

हा भगवद्गीतेंत दिलेला (व गौडपादाचार्यांनी उद्धृत केलेला) दृष्टान्त अत्यन्त हृद्य आहे. दीपज्योतीसारखा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चित्ताचा मूल चंचल स्वभाव व निर्विकल्प समाधींत त्याला प्राप्त होणारी अविचल अवस्था याची संपूर्ण कल्पना या दृष्टान्ताने येते.

जीवन्मुक्तावस्था

निर्विकल्प समाधीच्या अभ्यासाने जीवन्मुक्तावस्थेची प्राप्ति होते असें वेदान्त शास्त्रकारांचें म्हणणें आहे. मुण्डकोपनिषदामध्ये,

'भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥'

या श्लोकांत जीवन्मुक्तावस्थेचें वर्णन केलें आहे. निर्विकल्प समाधीमध्ये परब्रह्मात्मैक्याचा साक्षात्कार झाल्यानंतर हा 'जीवन्मुक्त' (अखिलबन्धरहितः ब्रह्मनिष्ठः) जगाचे व्यवहार कशा प्रकारें करतो किंवा अनुभवितो ? सामान्य मनुष्याचे लौकिक व्यवहार व (रामकृष्ण परमहंसासारख्या) जीवन्मुक्ताचे लौकिक व्यवहार यांमध्ये भेद असलाच पाहिजे. तो कसा असतो हें,

"यथेन्द्रजालमिति ज्ञानवान् तदिन्द्रजालं पश्यन्नपि परमार्थम् इदम् इति न पश्यति"

या लौकिक दृष्टान्ताने विशद केला आहे. गारुड्याचा खेळ जाणूनबुजून पाहणाऱ्याला, गारुड्याने काय वाटेल तें करून दाखविलें तरी तें सर्व मिथ्या इन्द्रजाल आहे असें स्पष्ट कळतें. त्याप्रमाणे ज्ञानशस्त्राने ज्याचें अज्ञानपटल नष्ट झालेलें असतें अशा जीवन्मुक्ताला जगांतील सर्व व्यवहार इन्द्रजालाप्रमाणे मिथ्या वाटत असतात. या इन्द्रजाल दृष्टान्ताने,

सुषुप्तवत् जाग्रति यो न पश्यति
द्वयं च पश्यन्नपि चाद्वयत्वतः ।
तथा च कुर्वन्नपि निष्क्रियश्च यः
स आत्मविन्नान्य इतीह निश्चयः ॥

(उपदेशसाहस्री)

किंवा

"स चक्षुरचक्षुरिव, सकर्णोऽकर्ण इव इत्यादि गूढ वचनांचा अर्थ विशद होतो.

वेदान्तशास्त्रकारांनी वेद व उपनिषद् वाङ्मयांतील अध्यात्मपर वचनांचा समन्वय लावून वेदांतशास्त्राचे सिद्धांत प्रतिपादन केले व त्यांचें विशदीकरण करण्यासाठी लौकिक दृष्टांत सांगितले. भौतिक शास्त्रें व जगताच्या कारणाचा शोध घेण्यासाठी आप्तवचनाच्या आधारावर विसंबून असलेलीं शास्त्रें यांमध्ये फार मोठा भेद हाच असतो की भौतिकशास्त्रज्ञ हा लौकिक किंवा भौतिक घटनांच्या आधारावरच आपल्या सिद्धांतांची उभारणी करीत असल्यामुळे त्याला लौकिक दृष्टांत मुद्दाम हुडकून काढावे लागत नाहीत. उलट आप्तवचनावर (किंवा कांही योगसिद्ध पुरुषांच्या स्वानुभवावर) आधारलेल्या आध्यात्मिक शास्त्रांचे सिद्धांत सामान्य जनतेस विशद करून सांगण्यासाठी लौकिक दृष्टांतांचा शोध करावा लागतो.

वेदान्त हें आप्तवचनाधिष्ठित शास्त्र आहे ही गोष्ट खरी, पण तें आप्त वचनांच्या केवळ शाब्दिक विचिकित्सेचें नसून 'स्वानुभवगम्य' शास्त्र आहे अशी भारतीयांची धारणा आहे. रसायनशास्त्रासारख्या एखाद्या भौतिक शास्त्राचे सिद्धान्त (त्या शास्त्राच्या विशिष्ट प्रक्रियेनुसार प्रयोग करून) जसे पडताळून पाहतां येतात त्याप्रमाणे वेदान्तशास्त्राचे सिद्धान्त श्रवण, मनन, निदिध्यासन तसेंच यम (अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह), नियम, (शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान) आसन (पद्मासन, सिद्धासन इत्यादि), प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा व समाधि या साधनामार्गांचा सातत्याने अवलंब करून अनुभवितां येतात. आपल्या भारतांत शंकराचार्य, ज्ञानेश्वर, रामकृष्ण परमहंस यांसारखे सुप्रसिद्ध व कित्येक अप्रसिद्ध पुरुष वेदान्ताचे अनुभवी होते. 'तत्त्वमसि', सोऽहं, अहं ब्रह्माऽस्मि, किंवा सर्वं 'सर्वं खल्विदं ब्रह्म' 'तत् सत्' यांसारख्या महावाक्यांतील संपूर्ण आशय या "अनेकजन्मसंसिद्ध" महापुरुषांनी साक्षात् अनुभविला होता. स्वतःचा इन्द्रियातीत दिव्य अनुभव सामान्य मानवाला देण्यासाठी, शंकराचार्य किंवा ज्ञानेश्वर यासारख्यांनी वाङ्मयाचा आधार घेतला. रामकृष्ण परमहंसांनी तर विवेकानन्दासारख्या चिकित्सकाला केवळ स्पर्शमात्रें स्वतःचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा अनुभव आणून दाखविला. ज्यांनी वाङ्मयांतून हा अनुभव समाजाला दिला त्यांचें वाङ्मय अगोचर अनुभवाच्या आविष्कारासाठी प्रकट झालेलें असल्यामुळें केवळ दृष्टान्त हेंच एकमात्र आलंबन त्यांना घ्यावें लागलें. पण त्यामुळे त्यांच्या वाङ्मयांत अभावितपणें एक प्रकारची रमणीयता आली. एक अभिनव काव्यसृष्टि त्यामुळे निर्माण झाली ही गोष्ट खरी असली तरी सामान्य काव्यरचनेमागे असलेला 'रमणीयार्थ–प्रतिपादन' एवढाच त्यांचा हेतु असूं शकत नाही. तेवढाच त्यांचा हेतु असता तर सामान्य कवींचे ग्रंथ वाचून, ज्या प्रकारचा आनंद अनुभवास येतो त्याच प्रकारचा आनंद ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांच्या वाचनाने आला असता. ज्ञानेश्वरीचें वरवर वाचन करणाऱ्याला तेवढाच आनंद लाभणें शक्य आहे. पण नित्य पारायण म्हणजे श्रवण, मनन व निदिध्यासन करणाऱ्या जिज्ञासूला त्या वरपांगी काव्यसृष्टीच्या सुंदर वेष्टनांत वेद–वेदांतांत प्रतिपादन केलेली दिव्य सिद्धांतरत्नें प्रत्यक्ष दिसूं लागतात. बहुमोल रत्नें विकायला ठेवतांना जवाहिरे लोक तीं मखमलीच्या सुंदर पेटींत घालून, बिल्लोरी काचेच्या आलमाऱ्यांत, झगझगीत विद्युद्दीपांच्या प्रकाशांत ठेवतात. त्याप्रमाणें वेदांताच्या दिव्य अनुभवाचीं अनर्घ रत्नें समाजापुढे मांडतांना लोकाभिरुचीला अनुसरून काव्यकोषांतून मांडण्यांत आलीं. ज्यांना रत्नें घ्यावयाची शक्यता नसते असे बाजारांतील भटके लोक जवाहिऱ्याच्या दुकानाची नुसती बाह्य शोभा पाहूनच संतुष्ट होऊन जातात. कारण आंतलीं रत्नें घेण्याचीच नव्हे तर पाहण्याची सुद्धा त्यांना ऐपत नसते. पण खरे रत्नाभिलाषी लोक त्या बहिरंगावर संतुष्ट होत नाहीत. बहुमोल रत्नें दाखवावयाचीं तर तीं इतक्या सुंदर पद्धतीनेच दाखविलीं पाहिजेत हें ते गृहीत धरून चालतात.

वेदांतशास्त्रकारांच्या प्रतिपादनाला वेदोपनिषदांच्या वचनांचा आधार असतो, तसला आधार घेऊन वेदांताच्या अनुभवी पुरुषांना लिहावयाचें नसतें. त्यांना वेदांतसिद्धांतांचा स्वानुभव सांगावयाचा असतो. त्यासाठी लौकिक दृष्टान्त हेंच एकमात्र माध्यम किंवा आलंबन त्यांना उपलब्ध असतें; कारण सामान्य जनतेला केवळ तेवढाच विषय स्वानुभवाचा असतो. पण त्या लौकिक घटना कितीहि परिचयाच्या असल्या तरी त्यांतून त्यांना तत्त्वदर्शन होत नाही. उलट तत्त्वानुभवी पुरुषांना प्रत्येक लौकिक दृश्यांतून किंवा घटनेंतून स्वानुभूत तत्त्वाचा प्रस्फुट साक्षात्कार होत असतो. त्यामुळे,

> जया अंतरीं भगवंत । राहिला अचल निवान्त ।
> तो स्वभावें जें जें बोलत । तें चि ब्रह्मनिरूपण ।।
>
> (दासबोध)

अशी त्यांची अवस्था झालेली असल्यामुळें आपल्या वाङ्मयांतून गूढतत्त्वांचें प्रकट–साकार–मूर्त पद्धतीने प्रतिपादन करूं शकतात. "प्रकट गुह्य बोले" हें सामर्थ्य बाह्य जगताचा अफाट अनुभव जन्मभर घेतला तरी मनुष्याला प्राप्त होत नाही. उलट आध्यात्मिक मार्गाने वेदांततत्त्वांचा दिव्य अनुभव घेतल्यानंतर ज्ञानेश्वरासारखा योगारूढ पुरुष आपल्या किशोरावस्थेंतच हव्या त्या लौकिक घटनेंतून किंवा नैसर्गिक दृश्यांतून परतत्त्वाचा स्पर्श सामान्य मानवाच्या हृदयास देऊं शकतो व म्हणूनच त्यांच्या ग्रंथाचें स्थान काव्यग्रंथांच्या श्रेणींत नसून उपनिषदांसारख्या 'अपौरुषेय' ग्रंथांच्या श्रेणींत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक-परामर्श

वेदांतील राष्ट्रदर्शन--ले० साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास; पृ. ४६१, मूल्य रु. ८.

वेदांतील राष्ट्रदर्शन हा अमोल ग्रंथ म्हणजे साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांनी १ एप्रिल १९५५ ते १७ एप्रिल १९५५ या काळांत पुणें येथे दिलेल्या पंधरा व्याख्यानांचा अधिकृत संग्रह होय. साहित्याचार्य हरदास हे विद्वत्ता सुविचार व अमोघ वक्तृत्व या गुणांनी सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. अशा अधिकारी व्यक्तीने हा ग्रंथ लिहिला आहे येवढें म्हटलें म्हणजे ग्रंथाच्या गुणांवद्दल वेगळें लिहिण्याची आवश्यकता नाही.

हिंदुस्थान देश स्वतंत्र झाला असला तरी तें स्वातंत्र्य केवळ राजकीय स्वरूपाचें आहे. मनाने तो अजून बऱ्याच अंशीं इंग्रजांच्याच सावलींत नांदत आहे. ही मानसिक गुलामगिरी नष्ट होऊन खऱ्या 'स्व'चा उदय झाल्याशिवाय आपण स्वतंत्र झालों असें परमार्थानें म्हणतां येणार नाही. हें वास्तव स्वातंत्र्य येण्यासाठी आमच्या राष्ट्राचें सांस्कृतिक विचारधन शुद्ध स्वरूपांत येथील नागरिकांना मिळालें पाहिजे. इंग्रज लोकांनी सहेतुकपणे आमच्या प्राचीन ग्रंथांसंबंधी कांही अपसमज संशोधनाच्या नांवाखाली प्रसृत केले. व 'साहेववाक्यं प्रमाणम्' असा तो काल असल्यामुळे आमच्याकडील पंडित, पुढारी आणि सुधारक या सर्वांनी ते शिरोवार्य मानले. तेव्हा हे अपसमज काढून टाकून आमच्या प्राचीन संस्कृतीचें शुद्ध मूळ स्वरूप अधिकार वाणीनें वारंवार नवीन पिढीपुढे येणें अत्यावश्यक झालें आहे. हें महत्त्वाचें कार्य शास्त्रीबुवांनी आपल्या व्याख्यानांच्या आणि त्यांच्या संग्रहग्रंथाच्या द्वारा आरंभिलें आहे ही भाग्याची गोष्ट आहे.

वेद हे भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ होत. 'वेदोऽखिलं धर्ममूलम्' हें वचन प्रसिद्धच आहे. त्या वेदाचें अंतरंगदर्शन शास्त्रीबुवांनी या ग्रंथांत भाविकपणे, तरीहि बुद्धिवादास धरून घडविलें आहे. वेदाभ्यासाची आधुनिक पद्धति, वेदाचा काल, आणि अनार्य म्हणजे काय, आर्यांचें मूलस्थान, वेदांचें अपौरुषेयत्व या प्रथम प्रथमच्या प्रकरणांतून या विषयाच्या सर्व वादग्रस्त प्रश्नांचा उपन्यास शास्त्रीबुवांनी फार सुंदर रीतीने केला आहे. आज या संबंधी उपलब्ध असणारीं सर्व मतें त्यांनी देऊन आपलें म्हणणेंहि मोठ्या विनयानें पण निश्चयाने मांडलें आहे. वरील प्रश्नांसंबंधी संशोधकांचीं विविध मतें असतील व तीं सारखींच प्रभावी असून त्यांत एकवाक्यता होण्याचा केव्हाहिं संभव नसेल तर जें मत राष्ट्रकल्याणार्थ उपयोगी असेल त्याचाच पाठपुरावा देशहितैषी माणसाने केला पाहिजे असें आम्हांस वाटतें. या दृष्टीने शास्त्रीबुवांचें विवेचन प्रत्ययोत्पादकच नव्हे तर कल्याणकारकहि आहे.

यापुढील प्रकरणांतून, भाई डांगे इत्यादि परंपराविच्छेदी लेखकांनी वेदवाङ्मयासंबंधी जो अनुचित आणि खोटा प्रचार आपल्या ग्रंथांतून मांडून अज्ञ वाचकांचा बुद्धिभेद करण्याचें पाखंडव्रत चालूं केलें आहे, त्याचाहि खरपूस समाचार शास्त्रीबुवांनी घेतला आहे. वैदिकाचें आध्यात्मिक अंतरंग आणि वैदिक राष्ट्राची परमार्थविषयक धारणा हीं दोन प्रकरणें हा या ग्रंथाचा मुख्य गाभा आहे म्हटलें तरी चालेल.

संपूर्ण ग्रंथ वाचल्यानंतर वेद, वैदिक संस्कृति व वैदिककाल या सर्वांचें ओजस्वी व तेजस्वी स्वरूप वाचकाच्या मनांत ठसून भारताच्या 'अस्मिते'संबंधी त्याच्या कल्पना निश्चित होतात. ठिकठिकाणीं वेदवाङ्मयांतून शेकडों वचनें उद्धृत केलीं असल्यामुळे विवेचन भरदार झालें आहे.

आजच्या बदलत्या काळांत आपण वैदिक कल्पनांहून पुढे गेलों की मागे आहोंत, आणि राष्ट्रकल्याणार्थ आज आपणाला वैदिक वाङ्मयापासून कोणती स्फूर्ति मिळूं शकते हें या ग्रंथाच्या परिशीलनाने चांगलें समजतें.

लो. ना. माधव श्रीहरि अणे यांची रोचक आणि मर्मग्राही प्रस्तावना हा या ग्रंथाचा विशेष आहे. प्रस्तावनाकारांनी 'वैदिक संस्कृतिरूप हिमालयांतील वेदचतुष्टयरूपी उत्तुंग शिखरावर असलेल्या तीर्थाचें दर्शन घेऊं इच्छिणाऱ्या यात्रेकरूस या व्याख्यानमाला ग्रंथाचा उपयोग एखाद्या उत्कृष्ट वाटाड्याप्रमाणे होईल' हें जें प्रशस्तिपत्र दिलें आहे तें यथायोग्य आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या ग्रंथांत स्वमताच्या अहंकारापेक्षाहि सन्मतांचा आग्रह शास्त्रीबुवांनी धरला आहे, त्याबद्दल त्यांचें आम्ही विशेष अभिनंदन करतों.

ज्यांना या ग्रंथांतील कांही मतें मान्य नसतील त्यांनाहि तो प्रभावी वाटेल यांत शंका नाही. अशा उत्तमोत्तम ग्रंथांची निर्मिति शास्त्रीबुवांकडून होत जावो अशी इच्छा व्यक्त करुन हा ग्रंथपरिचय संपवितों.

—पां. कृ. सावळापूरकर

साभार स्वीकार

दासोपंतांची पासोडी—सम्पादक-न. शे. पोहनेरकर. प्रकाशक-मराठवाडा साहित्य परिषद्, हैद्राबाद, मूल्य ८ रुपये.

संतकवि श्री दासगणू महाराज—(व्यक्ति आणि वाङ्मय) लेखक व प्रकाशक-अ. दा. आठवले, मूल्य साडे सात रुपये.

मिथिला—लेखक-अरविंद गोखले; प्रकाशक-लाखाणी बुकडेपो, मुंबई ४; मूल्य ३ रुपये (कथा संग्रह)

वर्षा--लेखक-गंगाधर गाडगीळ, प्रकाशक-लाखाणी बुकडेपो, मुम्बई ४, मूल्य ३ रु. (कथा संग्रह)

वाकळ--कवि-यशवंत; प्रकाशक-यं. दि. पेंढारकर पुणें, मूल्य ३ रु. (काव्य संग्रह)

पानोळ्या--कवि-भाऊ मांडवकर; प्रकाशक-सेवा प्रकाशन, नागपूर २; मूल्य अडीच रुपये (काव्य संग्रह)

कल्पनेचा खेळ--लेखक-पुरुषोत्तम दारव्हेकर; प्रकाशक-ठाकूर आणि कंपनी लि. अमरावती, मूल्य २ रु. (एकांकिका संग्रह)

दोन वहिणी--लेखक-ज्ञानेश्वर नाडकर्णी; प्रकाशक-मनीषा प्रकाशन, मुंबई ४; मूल्य २ रुपये; (कादंबरी)

पाऊस—लेखक-ज्ञानेश्वर नाडकर्णी; प्रकाशक-मनीषा प्रकाशन, मुंबई ४, मूल्य २ रुपये; (कथा संग्रह)

समाजांत नटाची जागा—लेखक-कै. राम गणेश गडकरी; प्रकाशक—सहकार प्रकाशन, पुणें, २; मूल्य २।। रुपये (निबंध संग्रह)

संतकवीचा अमृतकलश—लेखक व प्रकाशक-श्री. भा. पं. बहिरट, अध्यक्ष पंढरपूर संशोधन मंडळ, पंढरपूर, मूल्य ३ रुपये.

आलोक—लेखक-भगवंत देशमुख, प्रकाशक-ध्रुव प्रकाशन; हैद्राबाद (दक्षिण); मूल्य २ रुपये. (निबंध संग्रह)

बनगरवाडी—लेखक-व्यंकटेश माडगूळकर; प्रकाशक-मौज प्रकाशन; मुंबई ४; मूल्य अडीच रुपये. (कादंबरी)

हरिप्राप्तीसाठी भक्तिमार्ग उपदेश—लेखक व प्रकाशक-ना. फ. गणगणे; शेगांव (वऱ्हाड) मूल्य १२ आणे

प्रांतरचना व महाराष्ट्र—लेखक व प्रकाशक-वा. दा. रानडे; पुणें ४; मूल्य दीड रुपया.

मध्यप्रदेशांतील संशोधन कार्य--(सन १९३४ ते १९५४) प्रकाशक-कार्यवाह; मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर; मूल्य सव्वा रुपया (निबंध संग्रह)

लोकांचा राजा--लेखक-चि. य. मराठे, प्रकाश[illegible] मराठी प्रकाशन; मुंबई ४; मूल्य दोन [illegible] (चार अंकी नाटक) [illegible]य संघास

हुतात्मा बाबूराव थोरात—लेखक-[illegible]ाळ नामवंत व रा. व्यं. देशपांडे; चांदा; [illegible]व वेदान्तशास्त्र सेवा मंडळ, चांदा; मूल्य १० [illegible]स सद्गति देवो.

सावली—लेखक-ना. [illegible]रा. शेंडे; [illegible] प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर [illegible] रुपये; (कथा संग्रह)

रूपकथ्थक—प्रकाशिका-सौ. सरिता रे[illegible] माणेक हाऊस, खंबालाहिल, मुंबई २[illegible]

इंद्रधनु—लेखक-आकाशानन्द; प्रकाशक-व[illegible] प्रकाशन, गोंदिया (म. प्र.); (बालवाचका[illegible]जतो कथा संग्रह)

यांपैकी निवडक प्रकाशनांचा विस्तृत परामर्श पुढील अंकीं घेण्यांत येईल.

--संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

कार्यकारी मंडळाची सभा :

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची ३ री सभा दि. २८-४-५६ रोजीं सायं. ६-१० वाजतां संघाध्यक्ष बाळासाहेब ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत भरली.

(१) प्रथम सरचिटणिसांनी दि. १-४-५६ च्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

(२) १९५६-५७ सालच्या अंदाजपत्रकावर फेरविचार करण्यांत येऊन कांही किरकोळ फरकांसह तें वार्षिक साधारण सभेपुढे ठेवण्यांत यावें असें एकमताने ठरलें.

(३) श्री. माणिक के. बैतुले यांनी दिलेला विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीच्या संचालकपदाचा राजिनामा सरचिटणिसांनी वाचून दाखविला. त्यावर साधक बाधक चर्चा होऊन श्री. माणिक के. बैतुले यांनी आपला राजिनामा परत घेतला.

(४) आतापर्यंत, नवीन घटनेनुसार, विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांनी विविध कारणां-प्र भासदत्व सुरू ठेवण्यांत येऊं शकत नसल्याबाबत दिलेले अर्ज कार्यकारी मंडळाला सादर आले.

) आगरकर-टिळक जन्मशताब्दीचा कार्यक्रम संमत करण्यांत आला.

*

क साधारण सभा :

विदर्भ साहित्य संघाची, सकाळीं ८ वा. गणपूर्तीच्या अभावीं स्थगित झालेली, वार्षिक साधारण सभा रविवार दि. २९-४-५६ रोजीं सकाळीं ८-३० वा. केन्द्रीय कार्यालयांत संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

१. नवीन कार्यकारी मंडळाच्या कारकीर्दींत भरत असलेल्या ह्या पहिल्या साधारण सभेला उपस्थित असलेल्या सभासदांचें अध्यक्षांनी स्वागत केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२. दि. २९–१–५६ च्या विशेष साधारण सभेचा अहवाल आणि १९५६ चें कार्यवृत्त, जुन्या सरचिटणिसांच्या विनंतीवरून आणि त्यांच्या वतीने सरचिटणिसांनी वाचून दाखविलीं व तीं सर्वानुमतें मंजूर झालीं.

३. अध्यक्षांनी १९५६–५७ सालचे, अधिकृत हिशेब तपासनिसांनी तपासलेले, विदर्भ साहित्य संघाचे हिशेब सादर केले व ते एकमताने मंजूर झाले.

४. कोषाध्यक्षांच्या अनुज्ञेने व वतीने १९५६–५७ सालचें अंदाजपत्रक सरचिटणिसांनी सभेपुढे विचारार्थ मांडलें. अंदाजपत्रकांतील जमाखर्चाच्या बाबींवर तपशीलवार साधक बाधक चर्चा होऊन तें एकमताने मंजूर झालें.

५. १९५६–५७ साळासाठी विदर्भ साहित्य संघाचे अधिकृत हिशेब तपासनीस म्हणून श्री. महेश्वर गद्रे आणि कंपनी यांची एकमताने निवड झाली.

६. परीक्षा समितीबाबत श्री. द. शं. फडके यांनी पाठविलेला ठराव, ते स्वतः उपस्थित नसल्यामुळे, चर्चेस स्वीकारतां येत नाही असा अध्यक्षांनी निर्णय दिला.

७. सरचिटणिसांनी मांडलेला, लवाद श्री. खं. के. रांगोळे यांच्या आभाराचा पुढील ठराव एकमताने मंजूर झाला.

"श्री. खं. के. रांगोळे यांनी लवादाचें काम अत्यंत परिश्रमपूर्वक केलें याबद्दल ही सभा त्यांचे मनःपूर्वक आभार मानते."

८. अध्यक्षांनी मांडलेला, कै. डॉ. भाऊजी दफ्तरी यांच्याबद्दल दुखवटयाचा पुढील ठराव, एक मिनिट स्तब्ध उभें राहून सभेने एकमताने मंजूर केला.

"विद्वद्रत्न डॉ. केशव उर्फ दप्तरी यांच्या शोचनीय निधनाबद्दल विदर्भ साहित्य संघास अत्यंत दुःख होत आहे. डॉ. दफ्तरी हे या प्रांतांतीलच नव्हे तर अखिल भारतांतील नामवंत विद्वानांपैकी एक असून त्यांच्या निधनाने समचिकित्सा, ग्रहगणित, धर्मशास्त्र व वेदान्तशास्त्र हीं कांही काळ तरी पोरकीं झाल्यासारखीं झालीं आहेत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गति देवो.

"त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखांत वि. सा. संघ सहभागी आहे."

शेवटीं अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर ही सभा संपली.

* *

रंगमंदिर :

विदर्भ साहित्य संघाच्या मंदिर समितीची सभा दि. २०–४–५६ रोजीं सायं. ७ वाजतां विदर्भ साहित्य मंदिरांत भरली.

श्री. य. अ. खरे, इंजीनिअर, श्री. मणिलाल एच. पटेल, इंजीनिअर, श्री. नानासाहेब जोग आणि श्री. रा. वि. काळीकर या सदस्यांची एक उपसमिति नेमण्यांत आली. या उप-समितीने बांधकामाची व्यवस्था पाहावी असें ठरलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. य. अ. खरे आणि श्री. रा. वि. काळीकर यांना स्वीकृत सभासद करून घेण्यांत आलें व श्री. रा. वि. काळीकर यांची मंदिर समितीचे उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यांत आली.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति :

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीची प्राथमिक सभा दि. २४–४–५६ रोजीं केंद्रीय कार्यालयांत भरली.

तसेंच ह्या कार्यक्रमासाठी रु. २६१५ चें अंदाजपत्रक सभेने मंजूर करून तशी शिफारस कार्यकारी मंडळाला केली.

कै. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पुण्यतिथि व इतर कार्यक्रम :

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे दरवर्षींप्रमाणे यंदाहि लोकशिक्षणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची पुण्यतिथि गुरुवार दि. १७ मे १९५६ रोजीं सायंकाळीं ६–४५ वा. विदर्भ साहित्य मंदिरांत साजरी केली.

प्रा. अ. ना. देशपांडे यांनी आचार्यांच्या कार्यावर भाषण दिलें.

याशिवाय श्रीशंकराचार्य जयंती व बुद्धजयंती पुढीलप्रमाणे साजरी करण्यांत आली.

श्री शंकराचार्य जयंती ता. २१ मे सोमवार–व्याख्याते–साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास.

बुद्धजयंती ता. २४ मे गुरुवार–व्याख्याते म. म. प्रा. वा. वि. मिराशी.

सांस्कृतिक समितीचा आगामी कार्यक्रम

प्राध्यापकीय व्याख्यानमाला

महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी सामान्यत: ता. २० ते २७ आगस्टच्या दरम्यान त्या त्या विषयाच्या जाणकार प्राध्यापकांचीं व्याख्यानें करण्याचें समितीने योजिलेलें आहे. या व्याख्यानमालेचा प्रारंभ प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांच्या व्याख्यानाने होईल. व्याख्यानांचे विषय आणि वक्ते पुढे दिले आहेत.—

(१) प्रा. डॉ. वि. भि. कोलते—डॉ. केतकर आणि त्यांचें समाजशास्त्र.

(२) प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे—चंद्रसेनाची (हॅम्लेटची) समस्या.

(३) प्रा. व्यं. रा. वनमाली—१९व्या शतकांतील इंग्रजी कादंबरी.

(४) प्रा. भा. श्री. परांजपे—केतकरांच्या कादंबऱ्या

(५) प्रा. श्री. मा. कुळकर्णी—प्रा. फडके यांची कलासाधना

(६) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख--कवि 'बी' आणि केशवसुत.

(७) प्रा. श्री. भा. वर्णेकर--मृच्छकटिक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचीं व्याख्यानें

गतवर्षीप्रमाणे यंदाहि महाविद्यालयांतील विद्यार्थिवर्ग आणि साहित्यप्रेमी जनता यांच्यासाठी विदर्भाचे साहित्यपंडित प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचीं 'संस्कृत साहित्यशास्त्रांतील सौंदर्यविचार' या विषयावर सप्टेंबरच्या शेवटल्या आठवड्यांत तीन व्याख्यानें होतील.

महाराष्ट्रदर्शन

यंदा महाराष्ट्राची संस्कृति आणि अस्मिता यांचा परिचय लोकांना करून देण्यासाठी आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत 'महाराष्ट्रदर्शन' हा अभिनव व्याख्यानक्रम करण्याचें समितीने योजिले आहे. या व्याख्यानमालेंत पुढील व्याख्यानें होतील—

(१) प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे--महाराष्ट्र संस्कृति

(२) म. म. प्रा. वा. वि. मिराशी--महाराष्ट्रांतील प्राचीन कला

(३) प्रा. वा. कृ. चोरघडे---महाराष्ट्रांतील लोकसाहित्य

(४) प्रा. म. अ. चान्सरकर--महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.

याशिवाय इतरहि जाणकार वक्त्यांचीं भाषणें या व्याख्यानक्रमांत होतील.

प्रमुख साहित्यिकांचीं व्याख्यानें

याशिवाय महाराष्ट्रांतील अग्रगण्य लोकप्रिय साहित्यिकांचीहि व्याख्यानमाला त्यांच्या आवडत्या विषयावर होणार आहे. हा कार्यक्रम खाली दिला आहे—

(१) सौ. मालतीबाई बेडेकर

ता. १० आणि ११ नोव्हेंबर रोजीं (१) ललित वाङ्मय आणि जीवनसमस्या व (२) ललित वाङ्मयांतील स्त्री या विषयांवर दोन व्याख्यानें होतील.

(२) प्रा. ना. सी. फडके

ता. १, २, ३ डिसेंबर रोजीं (१) ललित वाङ्मयाचा अभ्यास (२) लघुकथेचें तंत्र व (३) कादंबरीचें तंत्र या विषयांवर तीन व्याख्यानें होतील.

(३) श्री. वि. स. खांडेकर

ता. १९ ते २३ जानेवारी १९५७ च्या दरम्यान (१) मराठी शैलीकार (२) मराठी निबंधकार आणि (३) मराठी विनोदी वाङ्मय या विषयांवर तीन व्याख्यानें होतील.

विशेष सूचना—सौ. मालतीबाई बेडेकर, प्रा. ना. सी. फडके आणि श्री. वि. स. खांडेकर यांचीं व्याख्यानें तिकिटें लावून होतील.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा हा कार्यक्रम नागपुरांतील विद्यार्थिवर्ग आणि साहित्यप्रेमी जनता यांनी सर्व प्रकारे सहकार्य देऊन यशस्वी करावा, अशी समितीची नम्र विनंती आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाट्य समिति :

विदर्भ साहित्य संघाच्या नाट्य समितीची प्राथमिक सभा शनिवार दि. ९ मे १९५६ रोजीं केंद्रीय कार्यालयांत भरली.

सभेंत या वर्षांत समितीने करावयाच्या कार्यक्रमाची चर्चा होऊन पुढील कार्यक्रमाच्या दृष्टीने विचार करण्यासाठी श्री. द. रा. गोमकाळे, श्री. केशव केळकर, श्री. पां. बा. गडकरी व श्री. रा. पु. सगदेव यांची एक उपसमिति नेमण्यांत आली.

* *

परीक्षा समिति

पदवीधरांना विनंती

विदर्भ साहित्य संघ उपाधिधारी शाल वितरण योजना

विदर्भ साहित्य संघाच्या साहित्यपारंगत, साहित्य स्नातक आदि परीक्षोत्तीर्ण उपाधिधाऱ्यांना निवेदन करण्यांत येतें की, यावर्षीं संघाच्या विद्यमानें १९ ते २९ जुलै ५६ या अवधींत साजरा केल्या जाणाऱ्या टिळक-आगरकर शतसांवत्सरिक महोत्सवांत संघाच्या सर्व पदवीधरांना शाल वितरण करण्याची योजना बनविली जात आहे. या योजनेनुसार:—

(१) ज्या पदवीधराकडून जास्तींतजास्त १९ जुन पर्यंत उपाधिधारी शाल शुल्क म्हणून ५ रु. येतील त्यालाच उपर्युक्त महोत्सवांत शाल व प्रमाणित उपाधिधारित्व प्रदान केलें जाईल.

(२) महोत्सवांत अनिवार्य कारणास्तव उपस्थिति न घडल्यास संबंधित केंद्राच्या आगामी प्रमाणपत्र वितरण संमारंभांत ती शाल प्रदान केली जाईल.

तरी संघाच्या उपाधिधाऱ्यांनी शुल्क पाठवून आपलें नांव नोंदवून घ्यावें. ज्यांना योग्य पत्याच्या अभावीं योजनापत्रक पोचलें नसेल त्याने स्वतःच्या पत्त्यावर तें त्वरित मागवून घ्यावें.

संघाच्या पदवीधरांना सविनय कळविण्यांत येतें की, विचाराधीन उपाधिधारी शाल योजनेचें पत्रक ज्यांना मिळालें नाही त्यांनी कृपया आपले पत्ते आणि ज्यांनी अद्याप योजनापत्र मिळूनहि उत्तरें पाठविलीं नाहीत त्यांनी ती परीक्षा समितीकडे त्वरित पाठवावीं.

केंद्राधिकाऱ्यांना विनंती

ऑगस्ट सत्राकरिता कोणत्या परीक्षेचीं किती आवेदनपत्रें हवींत हें निर्धारित पत्रकावर केंद्राधिकाऱ्यांनी त्वरित परीक्षा समितीला लिहून कळविण्याची कृपा करावी.

साहित्य पारंगत आणि साहित्याचार्य प्रबंध परीक्षा

एम. ए. समकक्ष साहित्य पारंगत आणि पी. एच. डी. समकक्ष साहित्याचार्य प्रबंध परीक्षेबाबत आवेदनपत्र व प्रश्नपत्रें इ. करिता गरजूंनी तावडतोब आठ आण्यांचीं तिकिटें पाठवावीत.

संदर्भ ग्रंथालय

माणक के. बैतुले
संचालक, परीक्षा समिति

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना बिनामूल्य. ✱ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ